# गोरेगाव फिल्मसिटीजवळ भीषण आग

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१ :

मुंबईच्या गोरेगाव फिल्मसिटी शेजारील नागरमोडी पाडा येथील आंबेवाडी परिसरातील घरांना भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. गोरेगाव पूर्व भागातील संतोष नगर भागात ही भीषण आग उसळली आहे. माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या १४ गाड्या संतोष नगर परिसरात दाखल झाल्या

गोरेगाव येथे लागलेल्या या आगीत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. आग विझवण्याचे अग्निशमन दलाचे शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र संतोष नगर भागातील घरांमध्ये असलेल्या सिलिंडरचे एकापाठोपाठ स्फोट होत गेले आणि आग झपाट्याने वाढत गेली. या आगीत अनेक झोपड्या जाळून खाक झाल्या असल्याचे समजते.


नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५० * अंक २३९ * * अमरावती * शनिवार, दिनांक २२ फेब्रुवारी २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

संपर्क

संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753

जाहिरात : 7447735851 / 9326906062

नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851

नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर - 440018



महासागर | NAGPUR POST

महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी

महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6

जोडी घेतल्यास फक्त 4 रुपयात


अग्राग्रलेख

## खरीखरी..

## मराठीचा गौरव आणि...

आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन केले. यावेळी मराठी भाषेचा गोडवा आणि मराठी भाषेचे साहित्य याविषयीची त्यांची विधाने खूप महत्त्वपूर्ण आहेत. एकूणच महाराष्ट्र आणि येथील मराठी भाषेची देशाच्या उभारणीत खूप महत्त्वाची भूमिका आहे. याचा पंतप्रधानांनी गौरवपूर्ण उल्लेख केला. भगवद्गीता सर्वसामान्यांना समजावी. म्हणून संत ज्ञानेश्वरांनी भगवद्गीतेला प्राकृत (बाराव्या शतकातील मऱ्हाठी) भाषेत ज्ञानेश्वरी लिहून सर्व सामान्यांसाठी गीतेचे ज्ञान परिभाषित केले. पंतप्रधानांनी आपण मराठी भाषेबरोबर कसे जोडले गेलो. याचा उल्लेख करताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्मरण केले. संघाचे मुख्यालय नागपूर येथे आहे. हे सर्वांनाच ठाऊक आहे. मात्र यामध्ये खरी गोम अशी आहे की, ज्यावेळी संघाची स्थापना झाली. त्यावेळी ही नागपूर मध्य प्रदेशची राजधानी होती. 1956 सालात भाषावार प्रांत रचना झाल्यावर सीव्ही आणि बेरार कायद्याअन्वये यातील बेरार म्हणजेच विदर्भ द्विभाषिक मुंबई राज्यात जोडण्यात आला. त्यावेळी मुंबई राज्यात गुजरातचाही समावेश होता. म्हणजे आताच्या गुजरात मधून आलेल्या पंतप्रधानांचे राज्य मुख्यालय मुंबई हेच होते. म्हणजेच त्या काळात मराठी मुंबईचा या दोन्ही विभागावर अंमल होता. त्यानंतर संयुक्त महाराष्ट्राचे जबरदस्त आंदोलन झाले. त्याबरोबरच गुजरात मध्येही महा गुजरातचे आंदोलन झाले होते. आचार्य अत्रे, सेनापती बापट, प्रबोधनकार ठाकरे, एस एम जोशी, कॉम्रेड डांगे यांच्यासारख्या इतर अनेक मराठी नेत्यांच्या घणाघाती प्रचारामुळे आणि आक्रमक भूमिकेमुळे 1957 साली काँग्रेस पक्षाने विदर्भातून बहुसंख्य आमदार निवडून आणल्याने काँग्रेसला आपली सत्ता राखता आली. म्हणजे कोणे एकेकाळी महाराष्ट्राने मराठी आणि गुजराती मुख्यमंत्री मुंबई राज्याने अनुभवलेले आहेत. अशा मुंबई राज्याचे 1 मे 1960 रोजी विभाजन होऊन महाराष्ट्र आणि गुजरात ही दोन राज्ये अस्तित्वात आली. तेव्हाचा हा इतिहास पंतप्रधानांना माहित असल्यामुळे मराठी भाषेबद्दल असलेला आदर त्यांच्या भाषणातून क्षणाक्षणाला प्रकट होत होता. मराठी भाषा अमृताहुन गोड आहे असे पंतप्रधान उगीच म्हणाले नाहीत. भगवद्गीतेच्या ज्ञानेश्वरी अवताराच्या नंतर लोकमान्य टिळकांनी गीतारहस्य लिहून गीतेचे वेगळे दर्शन घडवले. महाराष्ट्राला संत ज्ञानेश्वरांपासून तुकाराम त्यानंतर संत नामदेवांपासून ते संत गोरा कुंभार ते बहिणाबाई पर्यंत आणि आधुनिक वाल्मिकी गदिमां पासून विंदांपर्यंत असलेल्या भाषा वैभवाचा पंतप्रधानांनी उल्लेख केला. गेल्या पन्नास वर्षात पुरोगामी विचारांचे दलित साहित्य जनमानसाला लोकप्रिय झाले. हे सुद्धा पंतप्रधानांनी आवर्जून सांगितले. आपली मातृभाषा आणि आई एकसारख्याच असतात. त्या आपल्या लेकरासोबत भेदभाव करीत नाहीत. याचाही उल्लेख त्यांनी केला. मराठी भाषा अभिजात आहेच. पण त्याच गोष्टीला आपल्या कारकिर्दीमध्ये अभिजात दर्जा देण्याचे सौभाग्य लाभले. हा माझा गौरव आहे, असेही पंतप्रधान म्हणाले. आपण लवकरच मराठी बोलण्याचा प्रयत्न करणार आहोत. असे पंतप्रधान खास करून म्हणाले. त्यांनी वेळात वेळ काढून मराठी शिकवणा?्या गुरुजींची नियुक्ती करावी, अशी आमची प्रेमाची सूचना आहे. मराठी भाषेत भक्ती आहे शक्ती आहे आणि युक्तीही आहे, हे छत्रपती शिवाजी महाराजांनी दाखवून दिले म्हणजेच शूरता, वीरता आणि सभ्यताही आहे. पंतप्रधानांनी देशाच्या राजधानीत होणाऱ्या मराठीच्या या भव्यदिव्य सोहळ्याला अभिवादन करताना मराठीची महत्ता अशाप्रकारे जाहीरपणे मान्य केली. 1878 साली पहिल्या मराठी साहित्य संमेलनाची नोंद झालेली आहे आणि आता दिवसेंदिवस मराठी साहित्याच्या गौरवाची पताका सर्वत्र फडकत आहे. पंतप्रधानांनी मराठी भाषेला नतमस्तक होऊन जे काही गौरवास्पद स्थान दिलेले आहे. ते महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद आहेच. आजच हा सोहळा बघितल्यावर जयपूरच्या साहित्य संमेलनाची आठवण येत आहे. त्या ठिकाणी जे विविधरंगी कार्यक्रम होतात आणि चर्चा होतात. त्याचा अभ्यास आपल्या मराठी साहित्य मंडळाने केला पाहिजे. पंतप्रधानांनी मराठी भाषेचा एवढा गौरव केल्यावर त्यांचेही आशीर्वाद लाभतील, याबद्दल शंका नाही. या संमेलनाचा उद्घाटन सोहळा श्रीमंतीत साजरा झाला. आपल्या मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला. पण आपली नवीन पिढी कितपत शुद्ध मराठी बोलू शकते. याचा विचार करण्याची वेळ आता आली आहे. अत्यंत वेदनेने आम्हाला सांगावेसे वाटते की, आजच्या शाळकरी मुलांना शुद्ध मराठी बोलता येत नाही. किंबहुना, कोणतीही भाषा त्यांना सुयोग्यपणे बोलता येत नाही. प्रत्येकाला डॉक्टर, इंजिनियर किंवा आयटीमध्ये बॉलिंग करायची आहे. भाषा विषय शिकून वैभवात राहता येईल काय, असे त्यांना वाटते. तसेच माय मराठीत शिकलेल्या त्यांच्याच पालकांनाही वाटते. मराठी भाषेच्या या गौरवदिनी या बाबीवर लक्ष देणे, अत्यंत गरजेचे आहे. समस्त मराठीप्रेमी मराठी जनांना आमचे हे गंभीर आवाहन आहे.


nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023


# अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन

# अमृतापेक्षाही जास्त गोड मराठी..

## प्रधानमंत्री नरेंद्र मोदींकडून कौतुक, मराठीतून साधला संवाद

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २१ :

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा उद्घाटन सोहळा राजधानी दिल्ली येथे पार पडला. या कार्यक्रमाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्वागताध्यक्ष म्हणून शरद पवार उपस्थित होते. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उपस्थितांशी मराठी भाषेतून संवाद साधला. यावेळी मराठी भाषेवरील आपले प्रेम देखील मोदींनी व्यक्त केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, देशाच्या आर्थिक राजधानी आणि राज्यातून देशाच्या राजधानीत आलेल्या सर्व मराठी साहित्यिकांना माझा नमस्कार . आज दिल्लीच्या धर्तीवर मराठी भाषेच्या या कार्यक्रमाचे आयोजन होत आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन हे एक भाषेपुरते मर्यादित नाही. संत तुकारामांच्या मराठीला दिल्ली मनापासून नमन करते.

आज जागतिक मातृभाषा दिवस आहे तुम्ही दिल्लीतील साहित्य संमेलनासाठी दिवस सुद्धा अतिशय चांगला निवडला, असे मोदी मराठीमध्ये म्हणाले. यावेळी मोदींनी संत ज्ञानेश्वरांच्या मराठी भाषेवरील ओळी देखील म्हणून दाखवल्या. मराठी भाषा अमृतापेक्षा जास्त गोड आहे. त्यामुळे मराठी भाषेवर माझे जे प्रेम आहे हे आपल्या सर्वांना माहीत आहे. मी नेहमी मराठीमधील नवीन नवीन शब्दांना शिकण्याचा प्रयत्न करत असतो.

मोदी पुढे म्हणाले, संस्कृती जपण्याचे काम राष्ट्रीय स्वयंसेवक संघ गेल्या शंभर वर्षापासून करत आहे. आरएसएसने जगण्याची प्रेरणा दिली आहे आणि संघांमुळेच मी मराठी भाषेशी जोडलो गेलो आहे. देशात तसेच पूर्ण जगात १२ कोटीपेक्षा जास्त मराठी लोक आहेत. त्यामुळेच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचे काम मला करता आले हे मी माझे सौभाग्य मानतो.

भाषा केवळ संवादासाठी नाही तर संस्कृतीची संवाहक असते. भाषा समाजात जन्म घेते पण भाषा समाजाच्या निमार्णासाठी महत्त्वाची असते. यावेळी मोदी यांनी समर्थ रामदास यांचे मराठा तितुका मेळवा, याचे वाक्य म्हणून दाखवले.





### संतांनी मराठीतून समाजाला नवी दिशा दिली

मराठी एक संपूर्ण भाषा आहे. मराठीमध्ये शूरता आहे, वीरता आहे, सौन्दर्य आहे, संवेदना आहे, समानता आहे, समरसता आहे, अध्यात्माचे स्वर आहे आणि आधुनिकतेची लहर पण आहे, मराठी भाषेत शक्ती पण आहे युक्ती पण आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत गाडगेबाबा, गोरा कुंभार, बहिणाबाई अशा अनेक संतांनी मराठी भाषेतून समाजाला नवी दिशा दिली आहे. सुधीर फडके यांच्या गीत रामायणाने देखील मोठा बदल घडवला. छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज आणि बाजीराव पेशवा सारख्या वीर मराठ्यांनी शत्रूंना मजबूर केले. स्वातंत्र्याच्या लढाईत वासुदेव बळवंत फडके, लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर सारख्या सैनिकांनी इंग्रजांची झोप उडवली होती. केसरी आणि मराठा सारखे वृत्तपत्र, राम गणेश गडकरी यांचे नाटक, यातून स्वातंत्र्याचे काम केले.

### छावा चित्रपटाचा बोलबाला

मराठी भाषेने वंचित लोकांना पुढे आणण्याचे कार्य केले आहे. ज्योतिबा फुले, बाबासाहेब आंबेडकर यांनी मोठे महान कार्य केले आहे. मराठीने आपल्याला अनेक दलित साहित्यिक पण दिले.

मुंबई म्हटले की चित्रपटांचा विषय येतो. याच मुंबईने हिंदी चित्रपटांना देखील स्थान दिले. आज तर छावा चित्रपटाचा बोलबाला सुरू आहे. याची सुरुवात देखील मराठी लेखक शिवाजी सावंत यांनीच केली आहे, असेही मोदी म्हणाले.

## 'फुरोगामी' काहीही म्हणो, आमचे संत पुरोगामी होते..

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २१ :

९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात पुरोगामीत्वाचा उपहास करणाऱ्यांना खडेबोल सुनावले. 'फुरोगामी' काहीही म्हणो, आमचे संत खरोखरच पुरोगामी होते. त्यामुळे पंतप्रधान महाशय, तुम्हाला भेट म्हणून दिलेली विठ्ठल - रुख्मिणीची मूर्ती ही आमच्या उदारपणाचे प्रतीक आहे, असे त्या म्हणाल्या.

भवाळकर पुढे म्हणाल्या, आज फार काही बोलायेच नाही असा दम मला भरण्यात आला आहे. कारण नंतर बोलायचे आहे. पण देशाच्या पंतप्रधानांना आज आपण ज्या विठ्ठल - रुख्मिणीची मूर्ती दिली, ते आपल्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहे. ते आपल्या उदार संस्कृतीचे प्रतीक आहे. कारण, हा विठ्ठल आला कुठून? तर 'कानडा हो विठ्ठलु कर्नाटकू' म्हणजे हा कर्नाटकातून आला आणि महाराष्ट्रात स्थिरावला.

आजही वारीसाठी केवळ महाराष्ट्रातील नव्हे तर कर्नाटक व तेलंगणातूनही असंख्य लोक येतात. हा विठ्ठल मराठी माणसांसारखा साधा आहे. कष्टकरी माणसांसारखा आहे.

*'कांबळ खांदी वहाण पायीं डोईस मुंडासें,*
*श्यामलवर्णी सान रूप तव सोज्वळ मज भासे.'*

आत्ताच आपण मूर्ती पाहिली. गोऱ्या रंगाची त्याला हाऊस नाही. तो सावळाच आहे. केवळ सावळाच नाही तर तो काळा सावळा आहे. त्याचे भक्त सर्व जातीजमातींचे व धमार्चे आहेत, असे तारा भवाळकर म्हणाल्या.

संमेलनाध्यक्षा पुढे म्हणाल्या, महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांनी कसे स्वराज्य स्थापन केले? याचे विश्लेषण न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी केले. ते म्हणाले, संतांनी शिवाजी महाराजांसाठी भूमी निर्माण केली होती. कारण, मराठी भाषा संतांनी टिकवली. भाषा ही प्रत्यक्ष जिवनात असावी लागते. ती एक जैविक गोष्ट आहे. भाषा बोलली तर ती जिवंत राहते. केवळ पुस्तके व ग्रंथांतून ती जिवंत राहत नाही. म्हणून भाषा ही जैविक आहे.

▸▸ पान ८ वर

### संमेलनाध्यक्ष डॉ. तारा भवाळकर यांनी सुनावले खडेबोल



## कानाकोपऱ्यात मराठी माणूस

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २१ :



मराठी माणूस केवळ महाराष्ट्रात नव्हे तर आपल्या महाराष्ट्राचा झेंडा अटकेपार फडकावला आहे. दिल्ली मध्ये दिसतो, हरियाणामध्ये दिसतो, गुजरातमध्ये दिसतो. देशाच्या कानाकोप?्यात मराठी माणूस दिसून येतो, असे प्रतिपादन संमेलनाचे स्वागताध्यक्ष शरद पवार यांनी केले.

ते पुढे म्हणाले, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन राजधानीत दुसऱ्यांदा होत आहे. यावेळी देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आले याचा मला फार आनंद झाला आहे. महाराष्ट्र शासन, महाराष्ट्राचे रसिक, साहित्यिक या सर्वांनी पाठपुरावा केला आणि मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा पंतप्रधान मोदींनी मिळवून दिला मी जेव्हा याचे निमंत्रण देण्यासाठी गेलो तेव्हा मोदींनी एक मिनिट सुद्धा लावला नाही आणि महाराष्ट्राचा हा कार्यक्रम आहे तर माझी उपस्थिती असणार आहे असे त्यांनी सांगून टाकले. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनला महिला अध्यक्ष लाभल्या याचा मला आनंद असल्याचेही पवार म्हणाले.

## शिंदेंना धमकी प्रकरणाचे बुलढाणा कनेक्शन

### दोन युवकांना अटक



■ महासागर प्रतिनिधी

बुलढाणा, दि. २१ :

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे शासकीय वाहन बॉम्बने उडवून देण्याची धमकी देणाऱ्या दोघा युवकांना जेरबंद करण्यात आले आहे.

गोरेगाव (मुंबई ) पोलिसांनी बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगाव मही येथून दोन युवकांना आज शुक्रवार, २१ फेब्रुवारी रोजी सकाळी ताब्यात घेतले. त्यांची मुंबईत कसून चौकशी करण्यात येत आहे. ताब्यात घेतलेले तरुण नात्याने आतेभाऊ-मामे भाऊ असल्याचे सांगितले जाते.

या दोघांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे वाहन बॉम्बने उडवून देऊ, अशी धमकी दिल्याची माहिती २० फेब्रुवारीला मुंबईतील काही पोलीस ठाण्यांना मिळाली होती. याप्रकरणी गोरेगाव (मुंबई) पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

▸▸ पान ८ वर

### भाजप आमदार श्वेता महाले यांना

## जीवे मारण्याची धमकी

■ महासागर प्रतिनिधी

बुलढाणा, दि. २१ :



चिखली विधानसभा मतदारसंघाच्या आमदार श्वेता महाले यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याचे उघडकीस आले आहे. त्यांना ठार मारण्याची धमकी देणारे पत्र मिळाल्याने एकच खळबळ उडाली आहे.

या घटनेने त्यांचे समर्थक प्रक्षुब्ध झाले असून चाहत्यांतून तातडीने कारवाईची मागणी होत आहे. यानंतर चिखली पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दाखल करण्यात आली . आमदार श्वेता महाले या सुरक्षित असून त्या कोणत्याही अडचणीतून सावरतील, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे. मात्र, मतदारसंघातील वातावरण तणावपूर्ण झाले आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मनोगत

ताराबाईंचे भाषण ऐकल्यानंतर त्या भाषणातच आपण राहावे असे वाटत आहे. तसेच पंतप्रधान मोदींचे भाषण ऐकण्याचे देखील उत्सुकता आपल्याला लागली आहे. या दोन्हीमध्ये मी येऊन बोलत आहे. मी आदरणीय पंतप्रधान मोदींचे मनापासून आभार मानतो की मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचे काम आपण केले.



आपल्याला याची देखील कल्पना आहे की परकीय आक्रमकांनी ज्यावेळेस आपल्या भाषेला देखील प्रदूषित करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी हे ठरवले की राजकारभार मराठीमध्ये होणार आणि इतर भाषांमधील शब्दांना मराठीमध्ये रूपांतरित करण्यात आले. त्यामुळे याचे देखील श्रेय महाराजांना जाते.

# १०० ओबीसींना नोंदणीपासून फेलोशिप देण्याचा निर्णय रद्द

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २१ :

तत्कालीन महायुती - शिंदे सरकारने विधानसभा निवडणुकीच्या पूर्वी मते मिळवण्यासाठी काही निर्णय घेतले होते. महाज्योतीअंतर्गत पीएचडी करणाऱ्या ओबीसी, भटके विमुक्त आणि एसबीसी विद्यार्थ्यांना सारथी, बार्टीच्या विद्यार्थ्यांप्रमाणेच १०० टक्के फेलोशिप नोंदणी तारखेपासून फेलोशिप देणार असा निर्णय २३ सप्टेंबर २०२४ रोजी घेतला होता.

११ ऑक्टोबर रोजी इतर मागास बहुजन कल्याण मागास विभागाने शासन निर्णय प्रसिद्ध करून नोंदणी तारखेपासून फेलोशिप रक्कम १०० टक्के अदा करण्याचे आदेशसुद्धा दिले होते. मात्र, आता राज्यातील तब्बल ९०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना जॉयनिंग म्हणजेच कागदपत्रे पडताळणीपासून फेलोशिप देण्यात येत आहे.

सारथी, बार्टी आणि महाज्योती या तीनही संस्थानांमध्ये २०२२ पासून नोंदणी झाली आहे. ज्यामध्ये अनुसूचित जाती, भटके विमुक्त, ओबीसी, एसबीसी,अल्पसंख्याक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या पीएचडी विद्यार्थ्यांचा सहभाग आहे. या तीनही संस्थांमधील विद्यार्थ्यांसाठी एकसमान धोरण आखण्याची घोषणा विधानसभा निवडणुकीपूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. शिवाय, मंत्रिमंडळ बैठकीत तसा निर्णयही झाला.

शिंदे, तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच ओबीसी विभागाचे मंत्री अतुल सावे यांनी समाजमाध्यमांवर या निर्णयाचा प्रचार, प्रसारही केला होता. मात्र आता निवडणुकीनंतर सारथी, बार्टी वगळता महाज्योतीच्या विद्यार्थ्यांना यातून वगळण्यात आले आहे. या विद्यार्थ्यांना २५ जुलै २०२४ पासून फेलोशिप देण्याचा निर्णय महायुती सरकारने घेतला आहे. त्यामुळे गेल्या दोन वर्षातील भटके विमुक्त, ओबीसी, एसबीसी, अल्पसंख्याक विद्यार्थी आर्थिक अडचणीत सापडले आहेत.

या विद्यार्थ्यांना पीएचडीसाठी मासिक ३७ हजार रुपये फेलोशिप आहे. महाज्योतीच्या विद्यार्थ्यांना पीएचडी नोंदणी करून सुमारे अडीच वर्षे पूर्ण झाली आहेत. मात्र, आता २५ जुलै २०२४ पासून फेलोशिप देणार असल्याने अडीच वर्षातील खर्च कसा भरून काढणार असा प्रश्न विद्यार्थ्यांसमोर उभा राहिला आहे.

## हलक्यात घेणाऱ्यांचा टांगा पलटी : शिंदे

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २१ :

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे विविध कार्यक्रमासाठी शुक्रवारी नागपुरात होते. याप्रसंगी त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर सडकून टीका केली. शिंदे म्हणाले, मी आधीच बोललो आहे. ज्यांनी मला हलक्यात घेतले आहे. मी बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघे यांचा सच्चा कार्यकर्ता आहे. त्याच अनुषंगाने सर्वांनी माझा मूल्यमापन करायला हवे. ज्यांनी मला हलक्यात घेतले, त्यांचा मी २०२२ या वर्षीच टांगा पलटी केला. सरकार बदलले आणि लोकांच्या मनातले डबल इंजिनचा सरकार महाराष्ट्रात आणून दिले आहे.

राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या आधी मी स्पष्टपणे सांगितले होते. मी आणि देवेंद्र फडणवीस २०० पेक्षा जास्त विधानसभेच्या जागा निवडून आणू. प्रत्यक्षात २३२ जागा निवडून आणल्या आहेत. त्यामुळे मला हलक्यात घेऊ नये. ज्यांना हा संकेत समजून घ्यायचा आहे त्यांनी समजून घ्यावा, असाही टोका उद्धव ठाकरे गटाला एकनाथ शिंदे यांनी लावला. शरद पवार यांनी दिलेल्या पुरस्काराबाबत म्हणाले, मला महादजी शिंदे पुरस्कार मिळाला आहे.

▸▸ पान ८ वर




# मुंबईतील ओव्हल, आझाद आणि क्रॉस मैदानांच्या भाडेपट्टा नूतनीकरणासाठी धोरण तयार करावे : उपमुख्यमंत्री अजित पवार

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २१ :

"मुंबईतील ओव्हल मैदान, आझाद मैदान आणि क्रॉस मैदान ही केवळ खेळांसाठीच वापरण्यात यावीत," असे स्पष्ट निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत. या मैदानांवरील भाडेपट्टा करार नूतनीकरणासाठी महसूल, क्रीडा, सार्वजनिक बांधकाम आणि नगरविकास विभागाने समन्वय साधून नवे सर्वसमावेशक धोरण तयार करावे, असेही त्यांनी सांगितले.



मंत्रालयात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. या बैठकीला क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे (दूरदृश्य प्रणालीद्वारे), महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, बीएमसी आयुक्त भूषण गगराणी, क्रीडा विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव डॉ. के. एच. गोविंदराज, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव सदाशिव साळुंखे, तसेच क्रीडा संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

मुंबईतील ओव्हल, आझाद आणि क्रॉस मैदानांवर अनेक क्लब खेळाडूंना प्रशिक्षण आणि सरावाच्या सुविधा देतात. मात्र, या तिन्ही मैदानांचा उपयोग फक्त खेळासाठीच केला जावा, असे स्पष्ट करत "व्यावसायिक किंवा बिगर-खेळाशी संबंधित उपक्रमांना या मैदानांवर स्थान नसावे," असा ठोस आदेश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिला.

ही मैदानं महसूल विभागाच्या मालकीची असून क्रीडा विभागामार्फत क्लबांना भाडेपट्ट्यावर दिली जातात. मात्र, सध्याचा भाडेपट्टा करार कालबाह्य झाल्याने याच्या नूतनीकरणासाठी सरकारने नवे धोरण तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. नव्याने तयार होणारे धोरण मंत्रिमंडळाच्या मंजुरीसाठी ठेवण्यात येईल, अशी माहिती उपमुख्यमंत्र्यांनी दिली.

खेळाडूंच्या सोयीसाठी मैदानांवर अत्याधुनिक स्वच्छतागृहे आणि चेंजिंग रूम उभारण्याच्या सूचना अजित पवार यांनी दिल्या. मात्र, "ही सुविधा मैदानाच्या एका कोपऱ्यात उभारावी, जेणेकरून मैदानाच्या सौंदर्यावर परिणाम होणार नाही," असेही त्यांनी स्पष्ट केले.

महसूल, क्रीडा, सार्वजनिक बांधकाम आणि नगरविकास विभागांनी एकत्र येऊन भाडेपट्टा नूतनीकरणासाठी सर्वसमावेशक धोरण तयार करावे आणि ते विहित वेळेत पूर्ण करावे, असा आदेशही अजित पवार यांनी दिला.

राज्यातील खेळाडूंसाठी दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकार सातत्याने प्रयत्नशील आहे. "खेळ आणि खेळाडूंसाठी सरकार सकारात्मक धोरण आखत आहे," असेही अजित पवार यांनी सांगितले. मुंबईतील क्रीडापटू आणि क्रीडाप्रेमींना यामुळे मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

# फोडाफोडी सरकारचा स्थायीभाव असल्याने १० वीचा मराठी भाषेचाही पेपर फुटला

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २१ :

फोडाफोडी हा सध्याच्या राज्य सरकारचा स्थायीभाव आहे. त्यामुळेच दहावीचा मराठीचा पेपर देखील फुटला असल्याची टीका शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केला आहे. विशेष म्हणजे मराठी भाषेचा देखील पेपर फुटत असेल तर हे दुर्दैवच आहे, असे देखील त्यांनी म्हटले आहे. या माध्यमातून रोहित पवार यांनी राज्य सरकारवर निशाणा साधला आहे.

या संदर्भात आमदार रोहित पवार यांनी एका पोस्टच्या माध्यमातून राज्य सरकारवर टीका केली आहे. आज मातृभाषा दिन असून दिल्लीत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सुरु झाले आहे. त्याची आजच सुरुवात झाली आहे. असे असताना महाराष्ट्रामध्ये मराठी भाषेचा पेपर फुटत असेल तर हे दुर्दैव असल्याचे रोहित पवार यांनी म्हटले आहे. लगे रहो महायुती सरकार, असे म्हणत त्यांनी राज्यातील महायुती सरकारवर टीका केली. आता महाराष्ट्र थांबणार नाही, या महायुती सरकारच्या घोषवाक्याचा देखील रोहित पवार यांनी खोचक शब्द उल्लेख केला आहे. या

**आमदार रोहित पवार यांचा सरकारवर निशाणा**



संदर्भात आमदार रोहित पवार यांनी एक पोस्ट सोशल मीडियावर शेअर केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी राज्य सरकारवर टीका केली. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटले आहे की, 'फोडाफोडी हा या सरकारचा स्थायीभाव असल्याने १० वीचा मराठी भाषेचाही पेपर फुटलाङ्क विशेष म्हणजे आज मातृभाषा दिन असून दिल्लीत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनालाही आजच सुरवात झाली तरी मराठी भाषेचाही पेपर फुटत असेल तर हे दुर्दैवच आहेङ्क लगे रहो महायुती सरकार! महाराष्ट्र आता थांबणार नाही!'

आजपासून दहावी बोर्डाची परीक्षा सुरू झाली आहे. मात्र जालना जिल्ह्यातील बदनापूर येथे परीक्षा सुरू झाल्याच्या काही वेळातच मराठीचा पेपर लीक झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे आता याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने दहावी बोर्ड परीक्षेला आजपासून सुरुवात झाली. मात्र परीक्षेच्या पहिल्या दिवशी कॉपी मुक्त अभियानाचा फज्जा उडला. एकीकडे प्रशासनाच्या वतीने कॉफी मुक्त अभियानाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचा दावा केला जात आहे.

तर दुसरीकडे पहिल्याच मराठीचा पेपर जालना जिल्ह्यामध्ये लीक झाल्याची माहिती समोर आली आहे. एवढेच नाही तर केवळ वीस रुपयात परीक्षा केंद्र बाहेर पेपरची कॉपी मिळत होती, असा देखील आरोप केला जात आहे. त्यामुळे आता या संदर्भात शिक्षण विभाग काय निर्णय घेतो? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# छत्रपती शिवाजी महाराजांची आग्र्यावरून भरारी हा दिवस

## शिवचातुर्य दिन म्हणुन महाराष्ट्रात साजरा होणार.......!

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २१ :

आग्र्याच्या लाल किल्ल्यातील पोलादी सुरक्षा भेदून, छत्रपती शिवाजी महाराजांनी नजर कैदेतून बाल संभाजीसह घेतलेली भरारी; ही रोमांचकारी घटना असून या घटनेचे महत्त्व लक्षात घेऊन सांस्कृतिक कार्य विभाग तिथीनुसार "शिवचातुर्य दिन" म्हणुन साजरा करणार असल्याची घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी गुरुवारी येथे केली.



सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेल्या या कार्यक्रमात विनोद पाटील, एस पी सिंग बाघेल,विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, आ.परिणय फुके, छावा चित्रपटात मुख्य भूमिका साकारणारे विकी कौशल यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

आग्रा येथील लाल किल्ल्यावर सांस्कृतिक कार्य विभागाच्या सहकार्याने शिवजन्मोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आग्रा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विषयीचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे केंद्र बनवणार असल्याचे यावेळेस नमूद केले.

अँड.शेलार पुढे म्हणाले की, ज्या ठिकाणी परिंदा भी पर मार नही सकता अशी सुरक्षा यंत्रणा होती, ते सुरक्षा कवच मोठ्या युक्तीने भेदून औरंगजेबाला त्याच्याच इलाख्यात जाऊन मारलेली चपराक म्हणजेच आग्र्याहून सुटका होय!

शक्ती-युक्ती आणि चातुर्याची ही घटना संपूर्ण भारतासाठी प्रेरणादायक असल्याने, तिथीनुसार हा दिवस महाराष्ट्रात "शिवचातुर्य दिन" म्हणुन साजरा करण्यात येणार आहे. या दिवशी राज्यात ठिकठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येऊन, महाराजांची युद्धनीती, गनिमी कावा आणि भक्ती - शक्ती - युक्ती यावर प्रयोगात्मक कलेच्या माध्यमातून तसेच चर्चासत्रे/परिसंवाद/हेरिटेज वॉक माध्यमातून प्रकाश टाकण्यात येणार असल्याचेही त्यांनी नमूद केले. छ. शिवाजी महाराज यांच्या जीवनातील प्रत्येक क्षण हा महानाट्याचा विषय असल्याने, त्यांच्या कार्याचे विविध पैलू सांस्कृतिक माध्यमातून उलगडण्याचा प्रयत्न सांस्कृतिक कार्य विभाग करेल असेही त्यांनी पुढे सांगितले.

# "लाडकी बहीण" योजनेत मोठा बदल ९ लाख महिला अपात्र ठरणार

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २१ :

राज्य सरकारने "लाडकी बहीण" योजनेसाठी नवीन कठोर निकष जाहीर करत तब्बल ९ लाख महिलांना अपात्र ठरवण्याचा निर्णय घेतला आहे. यापूर्वी ५ लाख महिलांची संख्या कमी करण्यात आली होती, तर आता नव्याने आणखी ४ लाख महिलांना या योजनेतून वगळण्यात येणार आहे. या निर्णयामुळे सरकारच्या ९४५ कोटी रुपयांची बचत होणार आहे.

या निर्णयामुळे राज्यात राजकीय संघर्ष निर्माण झाला आहे. महाविकास आघाडीने सरकारवर टीका करत गरीब महिलांवर अन्याय होत असल्याचा आरोप केला आहे. मात्र, राज्य सरकारने हे अपात्रकरण गरिबीचे वास्तविक लाभार्थी शोधण्यासाठी आवश्यक असल्याचे सांगितले आहे.

राज्य सरकारने जाहीर केलेल्या नव्या निकषांनुसार, काही गटातील महिलांना योजनेतून वगळण्यात येणार आहे. "नमो शेतकरी" योजनेचा लाभ घेणाऱ्या ५ लाख महिलाः यांना "लाडकी बहीण" योजनेतून फक्त ५०० रुपये मिळणार आहेत, तर "नमो शेतकरी" योजनेतून १००० रुपये मिळणार आहेत.

वाहनधारक २.५ लाख महिलाः ज्या महिलांच्या नावावर वाहन आहे, त्यांना योजनेतून अपात्र ठरवण्यात आले आहे. ज्या महिलांना दिव्यांगत्वासाठी वेगळ्या योजनांमधून लाभ मिळतो, त्यांचीही छाननी करून त्यांना वगळले जाणार आहे. उच्च उत्पन्न गटातील महिलाः ज्यांचे वार्षिक उत्पन्न २.५ लाखांपेक्षा अधिक आहे, त्यांना योजनेतून काढले जाणार आहे.

योजनेसाठी चुकीची माहिती देणाऱ्या महिलाः अर्ज करताना दिलेल्या माहितीत विसंगती आढळल्यास त्या महिलांना अपात्र ठरवले जाणार आहे. १ जून ते १ जुलै दरम्यान महिलांना दरवर्षी ई-केवायसी करावी लागणार असून, हयातीचा दाखलाही जोडावा लागेल. आधार कार्ड योजनेशी लिंक नसेल, तर त्या महिलांना देखील अपात्र ठरवले जाणार आहे. राज्य सरकार प्राप्तीकर विभागाच्या मदतीने उत्पन्नाची पडताळणी करणार आहे.

"हा निर्णय महिलांचा आर्थिक शोषण करण्यासाठी आहे," असा आरोप ठाकरे गट, काँग्रेस आणि राष्ट्रवादीने केला आहे.

# राज ठाकरे मुंबईत भरवणार पुस्तक प्रदर्शन

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २१ :

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी येत्या 27 तारखेला मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर एक भव्य पुस्तक प्रदर्शन भरवण्याची घोषणा केली आहे. आजकाल दोन मराठी माणसं सुद्धा सर्रास एकमेकांशी हिंदी किंवा इंग्रजीत बोलतात. असं का होतंय हे कळत नाही. मराठी माणसात वैश्विक दृष्टिकोन निर्माण व्हावा अशी आमची मनापासून इच्छा आहे, पण त्यासाठीची खिडकी ही मराठीची असावी. आणि म्हणूनच हे पुस्तक प्रदर्शन आयोजित करत आहोत, असे त्यांनी म्हटले आहे.

या भाषेत किती अफाट साहित्य आणि त्यातून विचार निर्माण झाला आहे हे पुढच्या पिढयांना कळायलाच हवं. आणि हे का करावं लागेल तर आजकाल दोन मराठी माणसं सुद्धा सर्रास एकमेकांशी हिंदी किंवा इंग्रजीत बोलतात. असं का होतंय हे कळत नाही, मराठी उत्तम साहित्याची भाषा होतीच आणि ती परंपरा सुरु आहे ,पण मराठी ही आता ज्ञानाची भाषा देखील व्हायला लागली आहे.



जगभरातील अनेक उत्तमोत्तम पुस्तकं मराठीत येत आहेत, ज्यातून बदलत्या जगाचं भान येणं सहज शक्य आहे. हे आत्ताच पुढच्या पिढ्यांच्या मनात रुजवावं लागेल.

आणि हे जर घडलं तर अजून ताकदीने लेखक, विचारवंत या भूमीत निर्माण होतील. मराठी माणसात वैश्विक दृष्टिकोन निर्माण व्हावा अशी आमची मनापासून इच्छा आहे, पण त्यासाठीची खिडकी ही मराठीची असावी.

आणि म्हणूनच हे पुस्तक प्रदर्शन आयोजित करत आहोत. जरूर या प्रदर्शनाला भेट द्या. वाट बघतोय, असे राज ठाकरे यांनी म्हटले आहे.

# प्रियकराने कोयत्याने केले प्रेयसीचे शीर धडावेगळे

■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. २१ :

पुणे जिल्ह्यातील प्रेमी युगल फिरण्यासाठी गेले असता त्या दोघांमध्ये क्षुल्लक कारणावरुन वाद झाला. यानंतर चिडलेल्या चिडलेल्या प्रियकराने कोयत्याने वार करत प्रेयसीचे शीर धडावेगळं केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. मयत आणि आरोपी दोघे पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील आहेत. सोनाली राजू जाधव असं खून झालेल्या 28 वर्षीय तरुणीचे नाव आहे.

पुणे जिल्ह्यातून हे प्रेमी युगल फिरण्यासाठी राहुरी तालुक्यातील वांबोरी परिसरात गेले होते. प्रेयसीने पैसे मागितल्याच्या रागातून त्याने तिच्यावा कोयत्याने वार केला. यानंतर पोलिसांना फोन करत आपण विळद रोडवरील पिलेश्वर देवस्थान परिसरात असलेल्या गणपती मंदिरात जवळ प्रेयसीची हत्या केल्याची माहिती दिली.

पुण्यातील एक प्रेमी युगल 19 फेब्रुवारी फिरण्यासाठी राहुरीमध्ये आले होते. गेली अनेक दिवस ते लिव्ह इनमध्ये पुण्यात राहत होते. मात्र, काही दिवसांपूर्वी सोनाली तिच्या नवऱ्याकडे वापस गेली होती. तिने सखारामला मला तुज्यासोबत रहायचे आहे, मला पैसे दे नाही तर मी तुला सोडणार नाही अशी धमकी दिली. यानंतर ते दोघे अहिल्यानगरच्या राहुरी तालुक्यात फिरण्यासाठी गेले असता दोघांमध्ये पुन्हा पैशावरुन वाद झाला. यावेळी सोनालीने प्रियकर सखाराम वालकोळी याला पैसे दे नाहीतर पोलिसांमध्ये तक्रार करेल अशी धमकी दिली. त्यावरून सोनाली आणि सखाराम यांच्यात वाद झाला. त्यानंतर सखारामने सोनालीच्या मानेवर कोयत्याने वार केला, यात तिचे शीर धडावेगळे झाले. यानंतर आरोपी सखाराम हातात कोयता घेऊन 4 किमी चालत आला अन् पोलिसांना फोन करत मी सोनाली जाधव हिला ठार मारले तुम्ही वांबोरी परिसरात या असे सांगितले.

सखारामने फोन केल्यानंतर पोलिसांनी तात्काळ त्याला अटक करत घटनास्थळी धाव घेतली. पंचनामा करत सोनालीचा मृतदेह पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास वांबोरी ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवला. केवळ पैशाच्या वादातून ही हत्या झाली की यामागे काही वेगळे कारण आहे? आरोपी तिथे कसा आला या प्रकरणी पोलिसांकडून तपास सुरू आहे.

सांगली जिल्ह्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. आई सोबत कामगाराचे अनैतिक संबंध असल्याच्या रागातून एका अल्पवयीन मुलाने आपल्या मित्रांसोबत एका कामगाराचा दगडाने ठेचून खून केला. सांगलीवाडी ते कदमवाडी रस्त्यावर हा खून झाल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी पोलिसांनी तीन जणांना ताब्यात घेतले आहे.

सदरील व्यक्तीचा खून हा अनैतिक संबंधातून झाला असल्याचा अंदाज वर्तवण्यात येत होता. त्यानुसार पोलिसांनी चक्र फिरवली आणि अवघ्या काही तासातच तीन संशयितांना ताब्यात घेतले.

# विद्यार्थ्यांच्या भविष्यासोबत खेळ बंद करा : वर्षा गायकवाड

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २१ :

"राज्य मंडळाच्या दहावी परीक्षेच्या पहिल्याच दिवशी पेपरफुटीची घटना उघडकीस आल्याने सरकारच्या निष्काळजीपणाचा पदार्फाश झाला आहे," अशी घणाघाती टीका काँग्रेसच्या खासदार आणि मुंबई काँग्रेस अध्यक्ष वर्षा गायकवाड यांनी केली आहे. परीक्षेतील गैरप्रकार रोखण्यासाठी सरकारने मोठमोठ्या घोषणा केल्या असल्या, तरी "त्या पहिल्याच दिवशी फोल ठरल्या आहेत," असे त्या म्हणाल्या.

काही दिवसांपूर्वी बारावीचा पेपर एका झेरॉक्स सेंटरमध्ये सापडल्याची घटना ताजी असताना, आता दहावीच्या परीक्षेतही गडबड उघड झाली आहे. यावर प्रश्न उपस्थित करत "सरकार आणि शालेय शिक्षण विभाग अशा घटना रोखण्यात वारंवार अपयशी का ठरत आहेत?" असा थेट सवाल गायकवाड यांनी केला आहे. विद्यार्थी वर्षभर मेहनत घेतात, परीक्षांसाठी परिश्रम करतात. मात्र, "पेपरफुटीमुळे त्यांच्यावर अन्याय होतो आहे. ही विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळण्यासारखी गोष्ट आहे, आणि कोणालाही त्यांचे स्वप्न उद्ध्वस्त करण्याचा अधिकार नाही," असे वर्षा गायकवाड म्हणाल्या.

गायकवाड यांनी सरकारला इशारा दिला आहे की, "केवळ घोषणा करून जबाबदारी झटकू नका, तर या प्रकारांना रोखण्यासाठी तातडीने ठोस आणि परिणामकारक उपाययोजना करा." तसेच जालना प्रकरणातील सर्व दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

ही घटना समोर आल्यानंतर विरोधकांनी राज्य सरकारवर टीकेचा भडिमार केला आहे. काँग्रेससह महाविकास आघाडीच्या नेत्यांनी सरकारच्या निष्क्रीयतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून, "अशा घटना पुन्हा होऊ नयेत यासाठी सरकारने निर्णायक भूमिका घ्यावी," अशी मागणी केली जात आहे.

# अंजली दमानियांकडील कागदपत्रांच्या चौकशीची मागणी : आनंद परांजपे

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २१ :

राष्ट्रवादी काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते आनंद परांजपे यांनी अंजली दमानिया यांना मिळालेल्या गुप्त कागदपत्रांच्या सत्यतेबाबत पोलिस चौकशी करण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. त्यांनी सांगितले की, सनसनाटी आरोप करण्याचा अधिकार लोकशाहीत आहे, मात्र जबाबदार मंत्र्यांवर खोटी कागदपत्रे तयार करून २०० कोटींच्या व्यवहाराला मान्यता दिल्याचा आरोप चुकीचा आहे. दरम्यान, कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी १९९५ मधील फेरफार प्रकरणात आलेल्या निकालाविरोधात आजच मुंबई उच्च न्यायालयात अपील दाखल करणार असल्याचे स्पष्ट केले. राष्ट्रवादी काँग्रेसला न्यायव्यवस्थेवर पूर्ण विश्वास असून, खालच्या न्यायालयाच्या निकाला विरोधात स्थगिती मिळेल, असा विश्वास परांजपे यांनी व्यक्त केला. पालघर जिल्ह्यातील वाढवण येथे प्रस्तावित बंदर आणि आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या निर्णयाचे राष्ट्रवादी काँग्रेसने स्वागत केले आहे. महाकुंभ हा हिंदू धर्मीयांच्या आस्थेचा विषय असल्याने तारतम्य बाळगावे.

# शिंदे सरकार म्हणजे अपयशाचा मास्टरप्लॅन : आदित्य ठाकरे

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २१ :

मुंबईच्या कोस्टल रोडवरील हाजीअली ते वरळी दरम्यान झालेल्या निकृष्ट पॅचवर्कवरून शिवसेना (ठाकरे गट) नेते आणि आमदार आदित्य ठाकरे यांनी शिंदे सरकारवर तीव्र शब्दांत हल्लाबोल केला आहे. "मिंधे जिथे हात लावतात तिथे कामं रखडतात, खर्च वाढतो आणि गुणवत्तेचा बळी जातो," असे म्हणत त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांच्या सरकारच्या कार्यपद्धतीवर थेट आरोप केले. आदित्य ठाकरेंनी कोस्टल रोड प्रकल्पात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत शिंदे गटाच्या कंत्राटदारांवर निशाणा साधला. "हाजीअली ते वरळी दरम्यान पॅचवर्कच्या नावाखाली झालेला गैरव्यवहार याचाच ढळढळीत पुरावा आहे," असे ते म्हणाले. त्यांनी पुढे म्हटले, "मिंधे गट आणि त्यांचे लाडके ठेकेदार केवळ 'रस्त्यावरचा मलिदा' खाण्यात पटाईत आहेत. महाराष्ट्राच्या पायाभूत सुविधांचा त्यांनी बट्ट्याबोळ केला आहे."

# छत्रपती संभाजी महाराजांची बदनामी अखेर विकीपीडियावर कारवाई

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २१ :

छत्रपती संभाजी महाराज यांच्या विषयी चुकीची माहिती विकीपीडियाने प्रसारित केली असल्याने विकीपीडियावर आता कारवाईचा बडगा उचलण्यात आला आहे. संभाजी महाराजांबद्दल वादग्रस्त लिखाण विकीपीडियावर टाकणाऱ्या लेखकांवर गुन्हा दाखल होणार आहे. विकीपीडियाला संभाजी महाराजांविषयीचा वादग्रस्त कंटेंट हटवण्यासाठी तीन दिवसांचा वेळ देण्यात आला होता. मात्र विकीपीडियाने कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे आता थेट कारवाईचा बडगा सायबर पोलिसांनी उचलला आहे.

महाराष्ट्र सायबर सेल विकीपीडियावर असलेल्या चार ते पाच लेखकांवर गुन्हा दाखल करणार असल्याची माहिती समोर आली आहे. विकीपीडिया हे एक ओपन प्लॅटफॉर्म असल्याने काही लोकांना त्यांचे लिखाण त्यावर प्रकाशित करता येतात. सायबर सेलने जवळपास 10 ते 15 ईमेल विकीपीडियला पाठवले असून त्यांच्याकडून एकही उत्तर आले नाही. त्यामुळे महाराष्ट्र सायबर सेलने संबंधित लेखकांवर गुन्हा दाखल केला आहे.

छत्रपती संभाजी महाराजांना बदनाम करण्यासाठी अनेकांनी बदनामीकारक लेखन केले आहे. असाच काहीसा प्रकार माहितीचा स्त्रोत म्हणून प्रसिद्ध असलेल्या विकीपीडियावर दिसून आला होता. याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गंभीर दाखल घेतली आणि योग्य कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार महाराष्ट्राच्या सायबर सेलने मेल पाठवून विकीपीडियाला समज देण्याचा प्रयत्न केला. मात्र, विकीपीडियाने कुठलाही प्रतिसाद न दिल्याने अखेर कारवाई करण्यात येत आहे.

शंभूराजेंना 13 पेक्षा जास्त भाषांचे ज्ञान अवगत होते. शस्त्रावर जेवढी पकड तेवढीच शास्त्रावर देखील होते, त्यामुळे ते शास्त्र आणि शस्त्र दोन्हीमध्ये पारंगत होते. बुधभूषण हा ग्रंथ संभाजी महाराजांनी लिहिलेला आहे. स्वराज्यासाठी ज्यांनी आपल्या जिवाची देखील पर्वा केली नाही, अशा या संभाजी महाराजांविषयी बदनामीकारक लेख लिहिणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी केली जात आहे.

# यंदा सार्वजनिक मंडळांना पीओपीच्या गणेशमूर्ती बसवण्यावर बंदी

## न्यायालयाच्या निर्णयाचा हवाला

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २१ :

माघी गणपती उत्सवानंतर सार्वजनिक मंडळाच्या पीओपी गणेश मूर्तींना तलावांमध्ये विसर्जित करण्यास मुंबई महानगरपालिकेच्या वतीने परवानगी नाकारण्यात आली होती. त्यामुळे राज्यात बराच गोंधळ निर्माण झाला होता. मात्र, अखेर मंडळांनी या गणेश मूतीर्चे विसर्जन केले. त्यानंतर आता आगामी काळात येणाऱ्या गणेश उत्सवासाठी देखील मुंबई महानगरपालिकेने पीओपी मूर्तींना पूर्णपणे बंदी असल्याचे म्हटले आहे. या संदर्भात न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचा हवाला देखील मुंबई महानगरपालिकेने जाहीर केलेला पत्रकात देण्यात आला आहे.



माघी गणेशोत्सवाप्रमाणे यावर्षी आगामी सार्वजनिक गणेशोत्सवावर देखील कोर्टाच्या नियमाचे सावट असणार आहे. येणाऱ्या गणेशोत्सव आणि नवरात्री उत्सव पूर्णपणे पर्यावरण पूरक साजरा करावा, अशा आशयाचे परिपत्रक मुंबई महानगरपालिकेकडून जारी करण्यात आले आहे. त्यामुळे आता मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रात आगामी काळात होणाऱ्या गणेशोत्सवात पूर्णपणे पीओपीच्या मूर्तींना बंदी असेल. या संबंधात न्यायालयाच्या आदेशाचा देखील महानगरपालिकेने उल्लेख केला आहे.

सार्वजनिक उत्सव गणेशोत्सव 2025 हा पर्यावरण पूरक पद्धतीने साजरा करावा, तसेच सुरळीतपणे पार पडण्याच्या दृष्टीने मूर्तिकारांना मुंबई महानगरपालिकेने तात्पुरते मंडप उभारण्याकरिता दिले आहेत. त्याचप्रमाणे संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना देखील मार्गदर्शक सूचना करण्यात आल्या आहेत.

मात्र आता मुंबई महानगरपालिकेच्या वतीने नियमावली जाहीर केल्यानंतर सार्वजनिक गणेश उत्सव मंडळे, मूर्तिकार आणि राजकीय नेते काय भूमिका घेतात? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. या संदर्भात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे हे मुंबई महानगरपालिका आयुक्त यांची भेट घेणार आहेत.

# प्रोटोकॉलमध्ये वेळ वाया घालवू नका!

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंचे सर्व अधिकाऱ्यांना स्पष्ट आदेश

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.21 )** – मंत्र्यांच्या भेटीदरम्यान, अधिकाऱ्यांनी प्रोटोकॉलनुसार त्यांचा वेळ वाया घालवू नये. बऱ्याच वेळा दौऱ्यात विलंब झाला की अधिकारी त्यांचे काम सोडून दोन ते तीन तास वाट पाहत बसतात. यामुळे सर्वसामान्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे आता अधिकाऱ्यांनी कार्यालयात बसून वेळ वाया घालवू नये आणि नागरिकांची कामे करावीत, असे स्पष्ट निर्देश राज्याचे महसूल मंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत.



पालकमंत्री झाल्यानंतर बावनकुळे हे दुसऱ्यांदा शहरात आले होते. विश्राम भवन येथे त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी ही माहिती दिली. जिल्हा प्रशासन, महानगरपालिका, जिल्हा परिषद, पाटबंधारे विभाग आणि इतर सरकारी विभागांमध्ये उद्भवणाऱ्या समस्यांबद्दल त्यांनी वास्तव जाणून घेण्याचा प्रयत्न केला आणि यावर त्वरित कारवाई करण्याबाबतही त्यांनी सांगितले.

स्थानिक विश्राम भवन येथे पत्रकारांशी बोलताना त्यांनी केंद्र सरकारने संसदेत सादर केलेल्या अर्थसंकल्पात जाहीर केलेल्या लोककल्याणकारी योजनांविषयी सांगितले. त्यांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावी यासाठी त्यांनी ही योजना आखली. त्यांच्या मते, केंद्रीय अर्थसंकल्पात राज्याला काय मिळाले आणि राज्य जिल्ह्याला काय देऊ शकते. त्यांनी सांगितले की हे काम क्रमाने केले पाहिजे. ते म्हणाले की, राज्य सरकार प्रत्येक समस्येबाबत गंभीर आहे.

# देऊरवाडा येथे शेतात सापडले पुरातन शिवमंदिर

## मंदिर भानूतीर्थ असल्याची चर्चा | 1992 च्या महापुरात दबल्याचा अंदाज

*महासागर प्रतिनिधी*
*चांदुर बाजार( दि.21 )– तालुक्यातील विदर्भाची लहान काशी म्हणून सर्व दूर ओळख प्राप्त असलेल्या देवाचा वाडा म्हणून प्रचलित असलेल्या देउरवाडा येथे श्री नृसिंह महाराज मंदिरा च्या मागे खोदकामात शेकडो वर्षे जुने शिव मंदीर आढळून आले आहे. या मंदिराचा उल्लेख हा पयोष्णी ग्रंथात देखील असल्याचे सांगितले जाते. हे मंदिर बघण्यासाठी भाविकांची या ठिकाणी मोठी गर्दी झाली होती.*



### मोहाड गाव गेले होते वाहून

सदर मंदिर मागच्या दिशेला नदी काठावरील शेतात सन 1992 मधील महापुरात दबल्या गेले असावे असे जाणकार वृध्द सांगतात. त्याच महापुरात मोहाड हे गाव वाहून गेले होते. हे मंदिर नृसिंह मंदिराच्या मागील मो. अस्लम शे. आजम यांच्या शेतात सापडले. मंदिर नदीकाठी जमिनीच्या आत असून चुना, दगड, खरब आदी साहित्यांनी बांधण्यात आले आहे. वरून त्या मंदिरावर स्लॅबसारखे दिसून येते व मंदिराच्या आतमध्ये शंकराची जुने शिवलिंग आढळून आले. या मंदिराच्या दरवाज्याची कमान पूर्व दिशेला आहे. त्याचप्रमाणे वाळू व दगडाची एक मूर्तीदेखील मिळाली आहे.



चांदूर बाजार तालुक्यातील श्रीक्षेत्र देऊरवाडा येथे पूर्णा व मेघा नदीच्या संगमाजवळ पूर्णा नदीकाठी नृसीह महाराजांचे मंदिर आहे.

या मंदिराच्या पाठीमागे गुरुवारी (20 फेब्रुवारी) रोजी शेकडो वर्षांपूर्वीचे पुरातन शिवमंदिर जमिनीत आढळून आले. मो. असलम यांच्या शेतात हे पुरातन मंदिर सापडले असून हे मंदिर भानूतीर्थ असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे.

देउरवाडा ही भूमी अनेक साधू संत, देवी, देवता यांच्या पदस्पर्शाने पावन झाली आहे. गावात शेकडो वर्षे जुने शिव मंदिरे आहेतच त्यात आता आणखी मंदिर आढळुन आल्यानं भाविकांचा आनंद द्विगुणित झाला आहे. गावातील युवकांनी त्या मंदिरे च्या आजू बाजूचा परिसर स्वच्छ केला असून येणाऱ्या शिवरात्री निमित्ताने त्या ठिकाणी मोठी भाविकांची दर्शन साठी गर्दी पहायला मिळणार आहे.

### 18 तीर्थांनी समृध्द

पूर्णा नदी म्हणजेच वैष्णवी नदी होय. याठिकाणी पूर्णा नदी ही उत्तरवाणी असून हा भाग 18 तीर्थांनी समृध्द झाला आहे. या 18 तीर्थाचे वर्णन पयोष्णी किंवा पष्णवी ग्रंथामध्ये करण्यात आले. यात सोमतीर्थ, क्रोडतीर्थ, प्रवरतीर्थ,अमृततीर्थ, गरुडतीर्थ, विशालतीर्थ, लक्ष्मीतीर्थ, कपाल मोहनतीर्थ, अग्नीतीर्थ, पिशाचतीर्थ, भानूतीर्थ, कुतशौच महातीर्थ, बागेश्वरी तीर्थ, चक्रतीर्थ, पितृतीर्थ, कचतीर्थ, रुद्रतीर्थ, उमातीर्थ असे 18 तीर्थ आहेत. या 18 तीथपैकी, पूर्णा नदीच्या काठी सापडलेले पुरातन मंदिर भानूतीर्थ असल्याचे म्हटले जाते.

### पयोष्णी ग्रंथातील 16 व्या अध्यायात उल्लेख

जुन्या पष्णवी ग्रंथामध्ये, 16 व्या अध्यायामध्ये या तीर्थाचे वर्णन केले आहे. त्यामुळे गावकर्यांमध्ये काही दिवसांपासून कुजबूज सुरू होती. अखेर गावातील काही युवकांनी पुढाकार घेत जुन्या लोकांना विचारपूस करीत त्यांचा सल्ला घेतला व त्यानुसार शेतमालकाला भेटून शेतमालकाची परवानगी घेऊन 19 व 20 फेब्रुवारी रोजी श्रमदान करुन खोदकाम केले आणि जमिनीच्या आत असलेले मंदिर समोर आले. त्यानंतर मंदिर व भुयारातील शिवपिंड उजेडात आले. सदर मंदिराचा उल्लेख पयोष्णी ग्रंथातील 16 व्या अध्यायात आहे, असे सांगण्यात आले. देऊरवाडा हे गाव पुरातन व धार्मिक तीर्थक्षेत्र आहे. याठिकाणी पुरातन नृसिंह मंदिरदेखील आहे. नृसिंहाने हिरण्यकश्यपू राक्षसाचा वध केल्यानंतर आपली रक्ताने माखलेली नखे पयोष्णी नदीमध्ये याठिकाणी साफ केली होती, अशी आख्यायिका आहे. शिवपुराणातील पयोष्णी नदीचे वर्णन करण्यात आले आहे.

# अंगणवाडी सेविकांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.21 )**– अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना पेन्शन आणि ग्रॅज्युएटी तत्काळ लागू करावी, तसेच प्रधानमंत्री मातृत्व वंदन योजनेचे (PMMVY) काम आरोग्य विभागाकडे वर्ग करावे, या प्रमुख मागण्यांसाठी शुक्रवारी (दि.21) अंगणवाडी सेविका, मदतनीस आणि पर्यवेक्षिका कर्मचारी संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले.

प्रधानमंत्री मातृत्व वंदन योजनेचे काम आरोग्य विभागाकडे द्यावे. अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना पेन्शन व ग्रॅज्युएटी तात्काळ लागू करावी, पूर्ण वेळ सेवा असलेल्या अंगणवाडी कर्मचाऱ्यांना शासकीय-निमशासकीय कर्मचाऱ्यांना दर्जा द्यावा, 65 वर्षे पूर्ण केलेल्या सेवानिवृत्त सेविका व मदतनीस यांना 10 लाख रुपयांचे एकरकमी अनुदान द्यावे, 'लाडकी बहिण' योजनेसाठी अंगणवाडी सेविकांकडून सर्वेक्षण करू नये अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या. यावेळी अंगणवाडी सेविकांनी शासनाच्या निर्णयांवर तीव्र नाराजी व्यक्त केली. जर मागण्या त्वरित मान्य झाल्या नाहीत, तर अधिक तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला. याप्रसंगी जोरदार घोषणाबाजी करत शासनाच्या भूमिकेचा निषेध केला.

अंगणवाडी सेविका बालकांच्या पोषण आणि शिक्षणासाठी महत्त्वाचे कार्य करत असतानाही त्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा दिला जात नाही, याबद्दल सेविकांनी संताप व्यक्त केला. या आंदोलनात अंगणवाडी सेविका, मदतनीस, पर्यवेक्षिका व विविध संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी होते.

# सासरच्या त्रासाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या

## सासरच्या मंडळीविरुध्द गुन्हा

## विटाळा येथील घटना

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.21 )** – मुळबाळ होत नसल्याच्या कारणावरून एका विवाहितेचा शारिरिक व मानसिक छळ करण्यात आला. त्यामुळे सदर विवाहितेने आत्महत्या केली. याप्रकरणात मंगरुळ दस्तगिर पोलिस ठाण्यात 20 फेब्रुवारी रोजी सासरच्या मंडळीविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. शंकर ऋषीदास डाहे, ऋषिदास डाहे व दोन महिला (सर्व रा. विटाळा) अशी आरोपींची नावे आहेत.



मंगेश हरिदास मांढरे (32, रा. आजी, ता. जि. वर्धा) यांनी मंगरुळ दस्तगिर पोलिस ठाण्यात तक्रार दिली की, मुलबाळ होत नसल्याच्या कारणावरून सासरच्या मंडळीने महिला नातेवाईकाचा शारिरिक व मानसिक छळ केला आणि तिला आत्महत्येस प्रवृत्त केले. या तक्रारीवरून पोलिसांनी मृतक महिलेच्या सासरच्या मंडळीविरुध्द आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे.

# त्या दोन्ही डॉक्टरांना बजावल्या नोटीस

- बाल कल्याण समिती रिध्दपूरात
- सेवेकरी मुलीवरील लैंगिक अत्याचार प्रकरण

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 21 )** – रिध्दपूरातील एका आश्रमात सेवा देणाऱ्या अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याने तिला गर्भधारणा झाली. याप्रकरणात शिरखेड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून, आरोपींना अटक करण्यात आली आहे. दरम्यान 21 फेब्रुवारी रोजी सकाळी बाल कल्याण समितीने सदर मठाला भेट देत पाहणी केली.

जिल्हा महिला व बाल संरक्षण अधिकारी अजय डबले, विधी अधिकारी ॲड. सीमा भाकरे, भूषण कावरे, आकाश बरवट यांनी आपल्या पथकासह मठाला भेट देत तेथील तळघराची पाहणी केली. तसेच घटनाक्रम जाणून घेतला. त्यानंतर समितीने तेथील तीन महिला व एका पुरुषाशी संवाद साधला. सोबतच समितीने ग्रामपंचायतीमध्ये बैठक घेऊन सरपंच, सचिव, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य व अंगणवाडी सेविकांशी संवाद साधला. या प्रकरणात समितीने %त्या% दोन डॉक्टरांना नोटीस बजावल्या आहेत. त्यांना समितीसमोर हजर राहण्याचे सूचित करण्यात आले आहे.




# गिफ्ट देण्याचे आमिष दाखवून मुलीचे अपहरण

**अमरावती** – गिफ्ट देण्याचे आमिष दाखवून एका अल्पवयीन मुलीला पळवून नेल्याची घटना मोर्शी पोलिस ठाण्याच्या हद्दीत 19 फेब्रुवारी रोजी उघडकीस आली. या घटनेची तक्रार 40 वर्षीय महिलेने मोर्शी पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी रविंद्र भांगे (40, रा. जलालखडो, नागपूर) याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

# चाकुची दहशत पसरविणाऱ्या तरुणाला अटक

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.21 )**– हातात चाकु घेऊन नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणार्या एका आरोपीला नागपुरी गेट पोलिसांनी 20 फेब्रुवारी रोजी लालखडी परिसरातून अटक केली. अहमद खान हसन खान (40, रा. बिस्मिलानगर, अमरावती) असे आरोपीचे नाव आहे. त्याच्या ताब्यातून चाकु जप्त करण्यात आला आहे.



नागपुरी गेट पोलिस ताजनगर परिसरात पेट्रोलिंग करीत होते. दरम्यान पोलिसांना गुप्त माहिती मिळाली की, लालखडी परिसरात रेकॉर्डवरील गुन्हेगार हातात चाकू घेऊन दहशत निर्माण करीत आहेत. या माहितीवरून पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी जाऊन पाहीले असता, तेथे अहमद खान हसन खान हा हातात चाकु घेऊन फिरताना दिसला. त्यामुळे पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन, त्याच्याजवळील चाकू जप्त केला. याप्रकरणात आरोपीविरुध्द आर्म ॲक्टसह विविध कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या घटनेची तक्रार पोलिस हवालदार शिवनाथ आंधळे यांनी नागपुरी गेट पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपीविरुध्द गुन्हा नोंदविला.



# वसतीगृहातील विद्यार्थ्यांचे लॅपटॉपची चोरी

**अमरावती** – निंभोरा येथील विटभट्टीजवळ असणार्या समाज कल्याणच्या वसतीगृहातून विद्यार्थ्याचे लॅपटॉप चोराने लंपास केले. या घटनेची तक्रार प्रज्वल अरविंद हिवसे (22, रा. दाभाडा, मंगरुळ दस्तगिर, ह.मु. समाज कल्याण वसतीगृह, निंभोरा) यांनी 21 फेब्रुवारी रोजी बडनेरा पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञाताविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

# विकासात्मक कामांकरिता सीएसआर फंडातून देणार निधी!

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.21 )** – जिल्ह्याच्या विकासासाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध करून देण्यात येईल. प्रामुख्याने आरोग्य, शिक्षण, सार्वजनिक सुविधांसह जल संधारणाच्या कामांना प्राधान्याने निधी मंजूर केला जाईल. तसेच सीएसआरमधून निधी उपलब्ध करून देऊ, अशी माहिती पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.



पालकमंत्री बावनकुळे यांनी 21 फेब्रुवारी रोजी जलसंपदा विभाग, जिल्हा परिषदेत जाऊन बैठक घेतली. यावेळी त्यांनी सिंचन, पुनर्वसन, जलसंधारण, आरोग्य, आर्दीबाबत आढावा घेतला. त्यांच्या समवेत आमदार रवि राणा, प्रताप अडसड, केवलराम काळे, राजेश वानखडे, प्रविण तायडे, उमेश ऊर्फ चंदू यावलकर, प्रविण पोटे, जिल्हाधिकारी सौरभ कटियार आदी उपस्थित होते. सिंचन हा शासनाचा प्रथम प्राधान्याचा विषय आहे. प्रामुख्याने गेल्या वीस वर्षांपासूनची सिंचनाची व्यवस्था करण्यात आली आहे, अशी जुनी कामे शोधून त्याची दुरुस्ती आणि देखभाल करण्यात येणार आहे. टप्प्याने ही कामे घेण्यात येणार आहे. यामुळे अल्प निधीमध्ये याठिकाणी पाणी साचणार असल्याने सिंचनाची सोय होणार आहे. त्यामुळे प्रत्येक कामाची माहिती सादर करण्यात यावी. सिंचनाची व्यवस्था करताना दर्जेदार पुनर्वसनाची कामे करण्यात यावी. पुनर्वसित गावातील सर्व नागरिक स्थलांतरित होत नाही तोपर्यंत शासनाची जबाबदारी पूर्ण होत नाही. त्यामुळे पुनर्वसनाची कामे जलदगतीने पूर्ण करावीत, असे निर्देश पालकमंत्री बावनकुळे यांनी दिले. नाला खोलीकरण करून त्यातील माती पांदण रस्त्यासाठी वापरण्यात येणार आहे. तसेच प्रकल्पात गाळ आणि रेती साचली असल्यास आपत्ती व्यवस्थापनाअंतर्गत गाळ काढण्याची मोहीम हाती घेण्यात येणार आहे. त्यामुळे याबाबतचे प्रस्ताव सादर करण्यात यावे. जिल्ह्यातील सर्व सिंचन प्रकल्पांना भेटी देण्यात येणार आहे. यात पूर्ण झालेल्या कामांची पाहणी करण्यात येणार आहे. तसेच पुनर्वसन आवश्यक असलेल्या गावातील नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन त्यावर उपाययोजना करण्यात येणार आहे. शासनाकडून आवश्यक असलेली मदत यासाठी देण्यात येईल. पाणी गळती ही मोठी समस्या असून या बाबीवर लक्ष केंद्रित करावे. येत्या काळात सिंचनाची व्यवस्था सुरळीत करण्यात येणार आहे. यासाठी यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

### मेळघाटमध्ये तज्ञ डॉक्टरांची नियुक्ती

जिल्हा परिषदेत जलसंधारण, आरोग्य, महिला व बालविकास आदींचा आढावा घेतला. सार्वजनिक आरोग्य विभागात डॉक्टर आणि रुग्णवाहिका उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न करण्यात यावे. डॉक्टरांसाठी कमी मुदतीत मुलाखती घेण्याचे नियोजन करावे. आवश्यकता भासल्यास आयुर्वेदिक डॉक्टरांची भरती करण्यात यावी. प्रामुख्याने 'आपला दवाखाना' येथे डॉक्टरांची व्यवस्था करावी. मेळघाटसारख्या दुर्गम भागात विशेषज्ज्ञ डॉक्टरांची व्यवस्था करण्यात यावी.

# ध्वनीक्षेपकासाठी वर्षभरात 15 दिवस सुट -जिल्हाधिकाऱ्यांची विशेष परवानगी



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.21 )**– जिल्ह्यात ध्वनीक्षेपक आणि ध्वनीवर्धक वापरण्यास वर्षभरात 15 दिवसांसाठी सकाळी 6 वाजल्यापासून रात्री 12 वाजेपर्यंत जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी विशेष परवानगी दिली आले.

केंद्र शासनाच्या 10 ऑगस्ट 2017 च्या अधिसूचनेद्वारे ध्वनिप्रदूषण (नियम व नियंत्रण) सुधारित नियमानुसार, ध्वनिवर्धक व ध्वनिक्षेपक इत्यादींच्या वापराबाबत श्रोतृगृह, सभागृह, सामूहिक सभागृह आणि मेजवानी कक्ष यांसारख्या बंद जागांखेरीज इतर ठिकाणी जिल्ह्याच्या निकडीनुसार, वर्षभरात 15 दिवस निश्चित करून सकाळी 6 वाजल्यापासून ते रात्री 12 वाजेपर्यंत विशेष सूट जिल्हाधिकारी कटियार यांनी जाहीर केली आहे. ध्वनिवर्धक व ध्वनिक्षेपक वापरण्याबाबत देण्यात आलेली ही सूट राज्य सरकारने घोषित शांतता क्षेत्रात लागू नसेल. त्यामुळे या ठिकाणी ध्वनिप्रदूषण नियमावरील तरतुदीचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पर्यावरण संरक्षण कायद्यांतर्गत कठोर कारवाई करण्यात येईल. करण्यात आली आहे. वरील सर्वमान्यवरांनी इयत्ता दहावीच्या परीक्षार्थी विद्यार्थ्यांना परीक्षेच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

### या दिवसांसाठी विशेष सूट

19 फेब्रुवारी – छत्रपती शिवाजी महाराज जयंती, 6 एप्रिल – श्रीराम नवमी, 14 एप्रि ल – डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, 12 मे – बौद्ध पोर्णिमा, 15 ऑगस्ट– श्रीकृष्ण जयंती, 27 ऑगस्ट – गणेश चतुर्थी (गणपती स्थापना), 6 सप्टेंबर– अनंत चतुर्दशी, 26 सप्टेंबर – नवरात्र पंचमी, 30 सप्टेंबर – नवरात्र अष्टमी, 1 ऑक्टोबर – नवरात्र नवमी, 2 ऑक्टोबर – दसरा, 18 ऑक्टोबर – दिवाळी सण धनत्रयेदशी, 21 ऑक्टोबर – दिवाळी सण लक्ष्मी पूजन, 25 डिसेंबर – नाताळ, 31 डिसेंबर – नुतन वर्ष.

### 12 महिने सकाळी 6 वाजतापासून वाजतात ध्वनीक्षेपक

अनेक धार्मीकस्थळावरील ध्वनीक्षेपक 12 महिने सकाळी 6 वाजतापासूनच सुरु होतात, हे कदाचित जिल्हाधिकाऱ्यांना माहिती नसावे त्यामूळे त्यांनी वर्षभरात 15 दिवसांसाठी सकाळी 6 वाजल्यापासून रात्री 12 वाजेपर्यंत ध्वनीक्षेपकांकरिता विशेष सुट दिली आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# शेती अवजारे चोरणारी टोळी अखेर जेरबंद



## सहा आरोपींना अटक

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 21 )** शेती अवजारे चोरी करणार्या टोळीचा पर्दाफाश करण्यात अखेर स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना 20 फेब्रुवारी रोजी यश मिळाले. अंकुश गोपाल पारीसे (33, रा. जवर्डी ता. अचलपुर), आकाश विलासराव पारीसे (26, रा. राजना पूर्णा, शंकर रमेश बोरवार (30, रा.जवर्डी, ता. अचलपुर), विलास गणाजी बोरवार (30, रा. जबडी ता. अचलपुर), मजहर खाँ चांद खाँ (24, रा.कासदपुरा, अचलपुर) व अब्दुल गफ्फार शेख मोहमद (62, रा.कासदपुरा, अचलपूर) अशी आरोपींची नावे आहेत.

अमरावती ग्रामीण परिसरात गेल्या काही दिवसांपासून शेती उपयोगी साहित्य चोरीचे प्रमाण वाढले होते. या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी पोलिसांना मार्गदर्शन केले. या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक सचिन पवार यांचे पथक तपास करीत होते. दरम्यानच 20 फेब्रुवारी रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस अचलपुरात तपास करीत असताना पोलिसांनी गुप्त माहितीवरून अंकुश पारीसे, आकाश पारीसे, शंकर बोरवार, विलास बोरवार यांना दोन दुचाकींसह ताब्यात घेतले. त्यावेळी पोलिसांना त्यांच्याजवळ एका प्लास्टीफ पोत्यात केबल वायरमधील तांब्याचे तार दिसून आले. पोलिसांनी त्यांना तांबा तारबाबत विचारणा केली असता, चौघांनी मिळून विविध शेतशिवारातून केबल, मोटर पंप मशीन, स्प्रिकंलर, पाइप, अल्मुनियम तार व इतर शेतीपयोगी साहित्य चोरल्याचे सांगितले. सदरची कामगिरी पोलिस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलिस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वात सहायक पोलिस निरीक्षक सचिन पवार, पोलिस अंमलदार युवराज मानमोठे, रविद्र वर्हाडे, स्वप्नील तंवर, सागर नाठे, शांताराम सोनोने, चालक अंमलदार प्रज्वल राऊत यांनी केली.

### भंगारमध्ये विकले साहित्य

आरोपींनी केबलमधील तांब्याचे तारसह इतर साहित्य अचलपूरातील दुल्हा गेट येथील एका भंगार व्यवसायीकाला कमी किमंतीत विकल्याचे सांगितले. या माहितीवरून पोलिसांनी भंगार व्यवसायीक मजहर खाँ चाँग खाँ व अब्दुल गफ्फार शेख मोहम्मद या दोघांना दुल्हा गेट परिसरातून अटक केली. त्यानंतर पोलिसांनी आरोपींच्या ताब्यातून 3 मोटर पंप मशीन, 47 नग स्प्रिकंलर नोझल, 9 प्लास्टीक पाईप, अत्मुनियम तार जप्त केले.

### शेत माल चोरीचे 13 गुन्हे उघड

पोलिसांनी आरोपींना विविध गुन्ह्यातील घटनास्थळी नेऊन शहानिशा केली. तसेच पोलिसांनी शेतमाल चोरीच्या गुन्ह्यांची माहिती काढली असता, आरोपींनी विविध पोलिस स्टेशनच्या हद्दीत गुन्हे केल्याचे दिसून आले. आरोपींच्या चौकशीत पोलिसांनी 13 गुन्हे उघडकीस आणले आहे. यामध्ये शिरजगाव, सरमसपुरा, परतवाडा, ब्राम्हणवाडा, आसेगाव, चांदूरबाजार, चिखलदरा, अचलपुर येथील गुन्ह्यांचा समावेश आहे. पोलिसांनी आरोपींच्या ताब्यातून मोटर पंप मशीन, स्प्रिकंलर नोझल, प्लास्टोक पाईप, अल्मुनियम तार, तांबा तार व गुन्ह्यात वापरलेल्या वाहन असा एकुण 2 लाख 20 हजार 7400 रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त केला. आरोपींना मुद्देमालासह पोलिस कारवाईकरिता सरमसपुरा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

# पंचायत समितीसमोर सोमवारपासून आमरण उपोषण

## प्रशासकीय इमारतीला राष्ट्रसंत गाडगेबाबा नाव देण्याची मागणी



**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी ( दि.21 )** – पंचायत समिती कार्यालयाची नवीन इमारत तयार झाली असून या इमारतीला राष्ट्रसंत गाडगेबाबा प्रशासकीय इमारत असे नाव देण्यात यावे, अशी मागणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक प्रतिष्ठानचे तेजस अभ्यंकर व सुनील राक्षसकर यांनी केली आहे. या मागणीसीठी तेजस अभ्यंकर व सुनील राक्षसकर हे 24 फेब्रुवारीपासून पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसणार आहे. यासंदर्भातील निवेदन त्यांनी गट विकास अधिकारी यांना 21 फेब्रुवारी रोजी सोपविले आहे.

अंजनगाव सुर्जी तालुक्यात गाडगे बाबांची जन्मस्थळ असलेले शेंडगाव खासपूर हे संत गाडगेबाबा यांची जन्मभूमी व कर्मभूमी आहे. येथील नवीन प्रशासकीय इमारतीला राष्ट्रसंत गाडगेबाबा प्रशासकीय इमारत असे नाव देण्याची मागणी करण्यात आली आहे.

या प्रमुख मागणीसह पंतप्रधान आवास योजनेप्रमाणे रमाई आवास योजनेतील लाभार्थ्यांना घरकुल बांधण्याकरिता त्यांच्या आवश्यक त्या नातेवाईकांची संमती पत्र 500 रुपयाच्या स्टॅम्पवर घेऊन जागा उपलब्ध करून द्यावी व अशा घरकुलांना नमुना 8 वर नोंद घेण्यात यावी तसेच पंतप्रधान आवास योजना व रमाई आवास योजनेतील लाभार्थ्यांना घरकुलाचे अनुदान साडेतीन लाखापर्यंत करण्याकरिता प्रशासनाला आपल्या स्तरावर पाठपुरावा करण्यात यावा. या तिन्ही मागण्यांकरिता 24 फेब्रुवारीपासून पंचायत समिती कार्यालय समोर प्रांगणात उपोषण करण्यात येणार असल्याचे निवेदन गटविकास अधिकारी पंचायत समिती अंजनगाव सुर्जी यांना देण्यात आले आहे. यावेळी तेजस अभ्यंकर, सुनील राक्षसकर, बाळासाहेब आठवले, मनोज मुळे, साहेबराव सदाशिव उपस्थित होते.

# प्रतिभा ठाकरे अचलपूर कृउबा समितीच्या पहिल्या महिला सभापती



## अविरोध झाली निवड

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर ( दि.21 )**– तत्कालीन सभापती राजू उर्फ राजेंद्र गोरले यांना अचानक राजीनामा द्यावा लागला होता. त्यांच्यासोबत असलेल्या 13 संचालकांनी बंड पुकारत त्यांच्याविरोधात भूमिका घेतली होती. आपल्या प्रतिष्ठेचा विचार करून गोरले यांनी राजीनामा दिला. या पार्श्वभूमीवर जिल्हा निबंधक कार्यालयाने आज (21 फेब्रुवारी) ला नवा सभापती निवडण्यासाठी विशेष सभा बोलावली होती. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या 18 संचालकांपैकी 13 संचालकांनी प्रतिभा ठाकरे यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. त्यांच्याविरोधात कोणत्याही उमेदवाराने सभापती पदासाठी दावेदारी दाखवली नव्हती, त्यामुळे प्रतिभा ठाकरे बिनविरोध निवड झाली.

सभापती पदाच्या निवडीनंतर सहकार नेते बबलू देशमुख यांनी याला सहकार पॅनेलचा मोठा विजय म्हणून घोषित केले. आता प्रतिभा प्रशांत ठाकरे यांची निवड झाल्यानंतर कृषी उत्पन्न बाजार समितीतील संत्रा सेस चोरी, कापूस घोटाळा, कर्मचारी निवड घोटाळा आणि रोज होणाऱ्या सेस चोरीला आळा घालण्यासाठी कोणते पाऊल उचलले जातील, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.



# परतवाडा-अमरावती शिवशाही बसमध्ये प्रवाशांची लूट?

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपुर( दि.21 )** – परतवाडा ते अमरावती दरम्यान धावणाऱ्या शिवशाही एमएच 09 ईएम 1633) बसमध्ये वातानुकूलित सुविधा पूर्णत: बंद असतानाही प्रवाशांकडून 135 रुपये प्रति तिकीट आकारले जात आहे, अशी गंभीर तक्रार प्रवासी गजानन चहाटे यांनी केली आहे.

परतवाडा आगाराची ही बस असून, गरम हवामानात प्रवाशांना प्रीमियम दराने विना-एसी प्रवास करावा लागत आहे. याबाबत प्रवाशांनी वाहकाला विचारणा केली असता समाधानकारक उत्तर मिळाले नाही. तिकीटाचे संपूर्ण पैसे भरूनही प्रवाशांना गैरसोयीचा प्रवास सहन करावा लागत आहे, हे अन्यायकारक असल्याचे केले. शिवशाही त्यांनी स्पष्ट प्रवासासाठी प्रवाशांकडून जादा दर घेतला जातो, त्यामुळे वातानुकूलित यंत्रणा सुरू नसताना प्रवाशांची लूट होत आहे, असे चित्र स्पष्ट होत आहे. यावर तात्काळ चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी प्रवाशांकडून केली जात आहे. राज्य परिवहन महामंडळ व जनतेच्या प्रतिनिधींनी याची तात्काळ दखल घेऊन प्रवाशांच्या सुविधांची पडताळणी करावी, अन्यथा लोकांचा संताप अधिक तीव्र होऊ शकतो.

# लाखोंची फसवणूक करणाऱ्या आरोपीला अखेर अटक

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.21 )**– बिझीलँड येथील गुरुकृपा गारमेंट्सच्या मालकाला व्यवस्थापकाने 53 लाखांनी गंडविले होते. याप्रकरणातील आरोपीला अटक करण्यात आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना 20 फेब्रुवारी रोजी यश मिळाले. अनिल पंजवानी असे आरोपीचे नाव आहे. न्यायालयाने आरोपीला सात दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

**7 दिवसांचा पीसीआर**

माहितीनुसार, अमर आहुजा यांचे बिझीलॅन्ड येथे गुरुकृपा गारमेंट नामक दुकान आहे. त्यांच्या दुकानात अनिल पंजवानी हा व्यवस्थापक म्हणून काम करीत होता. आहुजा यांनी त्यांच्या व्यवसायाची संपूर्ण जबाबदारी अनिलवर सोपविली होती. त्यामुळे बहुतांश आर्थिक व्यवहार अनिल पंजवानी पाहत होता. परंतू अनिल पंजवानीने पैसांच्या लोभापाई गोदामातील साहित्यांची परस्पर विक्री करून लाखो रुपयांचा घोळ केला. हा प्रकार उघड झाल्यानंतर पोलिस ठाण्यात तक्रार करण्यात आली. फसवणुकीची रक्कम मोठी असल्याने हे प्रकरण आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आले. त्यानंतर आरोपीविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला. याप्रकरणात पोलिस आरोपीचा शोध घेत होते. दरम्यान आरोपीने जामीन मिळविण्यासाठी उच्च न्यायालयात प्रयत्न केले. त्यानंतर त्याने सर्वोच्च न्यायालयात सुध्दा धाव घेतली. परंतू त्याचा जामीन फेटाळण्यात आला. त्यामुळे पोलिसांनी आरोपी अनिल पंजवानीला मंगळवारीच अटक केली. अमरावती येथील न्यायालयाने आरोपीला सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. याप्रकरणात अद्यापपर्यंत कोणतीही जप्ती झालेली नाही. पुढील तपास पोलिस निरीक्षक हनुमंत गिरमे यांच्या मार्गदर्शनात आर्थिक गुन्हे शाखेचे पोलिस करीत आहेत.

## शांतिनिकेतन इंग्लिश शाळेत शिवजयंती साजरी

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी, ( दि. 21 )** – येथील शांतिनिकेतन इंग्लिश स्कूलमध्ये हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विविध कार्यक्रमांचे आयोजन शाळेत करण्यात आले होते.

शाळेचे मुख्याध्यापक अमोल चौधरी यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून कार्यक्रमाला प्रारंभ झाला. मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करून त्यांना वंदन करण्यात आले. अनेक विद्यार्थी शिवाजी महाराज व माँ जिजाऊ यांची वेशभूषा करून कार्यक्रमात सहभागी झाले होते. त्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणातून शिवाजी महाराजांच्या कार्यकर्तृत्वाविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. काही विद्यार्थ्यांचीही शिवाजी महाराजांच्या जीवन चरित्रावर भाषणे झालीत. कार्यक्रमाला शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# लोणीच्या जागृत विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**महासागर प्रतिनिधी**

**लोणी, ( दि. 21 )** – वरुडच्या जागृत नवयुवक शिक्षण संस्थेद्वारा संचालित लोणी येथील स्व. केशवराव क्षिरसागर जागृत विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ नुकताच पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध वक्ते व कलावंत तथा दिग्दर्शक हरीश आजनकर हे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून वरुडच्या गुरुदेव कॉन्व्हेंटच्या संचालिका हिमानी आजनकर, कन्हैया कोचिंग क्लासेसचे संचालक व ग्रामपंचायत सदस्य चेतन खोडस्कर, ओम कॉम्प्युटरचे संचालक मंगेश आसरे, यशवंत इन्स्टिट्यूटचे संचालक रुपेश नारिंगे, नितीन उघडे, किशोर राऊत, मुख्याध्यापक साहेबराव पेठे उपस्थित होते.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. नववीच्या विद्यार्थ्यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देताना आपले मनोगत व्यक्त केले. दहावीच्या विद्यार्थ्यांनी निरोपाला उत्तर देत शाळेसोबत निर्माण झालेल्या ऋणानुबंधांना उजाळा दिला. दहावीच्या वर्ग शिक्षिका वैशाली लाड यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. चेतन खोडस्कर, रुपेश नारिंगे, हिमानी आजनकर, साहेबराव पेठ यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सातवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या महाआयटी जीनियस परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व पुरस्कार प्रदान करण्यात आले. दहावीच्या विद्यार्थ्यांनी शाळेला भेटवस्तू दिली. कार्यक्रमाचे संचालन राधा खेरडे, नंदिनी बद्रे यांनी तर आभार प्रदर्शन दिक्षिता क्षीरसागर, वैष्णवी डोंगरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पी. टी. मंदाने, वैशाली लाड, निळकंठ नेरकर, कीर्ती पाचघरे, चेतन तडस, रंजना काळकर, दीपक दुपारे, अमित देशमुख, सुरेश उईके, अरविंद देशमुख, अनिल मोहरकर, अर्चना ठाकरे यांनी परिश्रम घेतले.

# 16.63 कोटींचा डीपीआर

## पंचायत विभागात अधिकाऱ्यांची लगबग, प्राधान्य क्रमानुसार प्रस्ताव

**झेडपीत 15 वा वित्त आयोगाचे पुर्वनियोजन**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 21 )** – जिल्हा परिषदेला 15 व्या वित्त आयोगाच्या प्राप्त होणाऱ्या संभाव्य 16.63 कोटींच्या निधीतून 2025-26 चा विकास आराखडा तयार करण्याची पंचायत विभागातून लगबग सुरू झाली आहे. आगामी जिल्हा परिषदेच्या आराखड्यात महत्त्वाच्या कामांचा प्राधान्यक्रमानुसार समावेश करण्यात येणार असल्याची माहिती आहे. 15 व्या वित्त आयोगाचा 80 टक्के निधी हा थेट ग्रामपंचायतींना मिळतो. तर, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेला प्रत्येकी 10 टक्के निधी दिला जातो. 16 विभागातील कामांचा विकासआराखड्यात समावेश करण्यात आला आहे. त्यात कामे प्राधान्यक्रमाने मागितली आहे.



बॉक्स

या कामांचा राहणार समावेश

शासनाच्या मार्गदर्शनानुसार गरिबी निर्मूलन, स्वच्छ गाव, आरोग्य, प्लास्टिकमुक्ती यासह 17 विविध मुद्यांकडे लक्ष वेधून आराखड्यात कामाचा समावेश असावा, अशा सूचना केल्या आहेत. 2025-26 या वर्षात बंधित आणि अबंधित याचा विचार करून गरजेची कामे सुचविण्याबाबत विभागप्रमुखांना सूचना दिल्या आहेत. आता शिक्षण, आरोग्यासह जिल्हा परिषदेच्या 16 विभागांतून कामे सुचवली जाणार आहेत. त्याची छाननी केली जाईल व त्यानंतर संबंधित आराखड्याला मंजुरीची प्रक्रिया राबवली जाणार असल्याची माहिती आहे. जिल्हा परिषद व पंचायत समितीवर प्रशासक राजवट असल्याने 15 व्या वित्त आयोगाचा प्रत्येकी 10 टक्के निधी मिळालेला नाही.

# खरबी गाव सावंगा (बु.) ग्रा.पं. मधून काढून येरड ग्रा.पं. मध्ये समाविष्ट करू नये

## ग्रामपंचायतने घेतलेला ठराव रद्द करावा | नागरिकांचे खंडविकास अधिकाऱ्यांना निवेदन

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे ( दि. 21 )**– चांदूर रेल्वे तालुक्यातील खरबी (मां.) हे गाव सावंगा (बु.) ग्रामपंचायत मध्ये बरेच वर्षापासून सामाविष्ट आहे. हे गाव सावंगा( बु.) ग्रा. प. मधून काढून येरड (बाजार) ग्रा. प. ला समाविष्ट करण्याचा 14 फेब्रुवारी रोजी घेतलेल्या ग्रामसभेचा ठराव अमान्य असल्याबाबतचे निवेदन खरबी (मांडवगड) येथील नागरिकांनी स्थानिक पं.स. चे खंडविकास अधिकारी यांना दिले आहे.




तक्रारीनुसार 14 फेब्रुवारी रोजी सावंगा बु. ग्रामपंचायतच्या सरपंच खरबी मांडवगड येथील सौ. भारती बागडे यांनी ग्रामसभेचे आयोजन खरबी (मांडवगड) येथील समाज मंदिरासमोर केले होते. सदर सभेची वेळ 11 वाजता सांगितली असता हेतूपुरस्पर सभेची सुरुवात 1.30 वाजता केली. त्यानंतर ग्रा. प. सचिवांनी 100 लोकसंख्या हजर पाहिजे त्याशिवाय सभा सुरू होणार नाही असे सांगितले. तेव्हा गावातील काही पक्षपाती लोकांनी घरोघरी जाऊन लोकांना बोलावून आणले आणि आपल्या बाजूस करून हा प्रकार उघडपणे केला असुन हा सामाजिक धोका आहे असे निदर्शनास आल्याचे तक्रारकर्त्यांनी म्हटले आहे. जे लोक या गावचे रहिवासी नाही अशा लोकांना सुद्धा समाविष्ट करून लोकसंख्येचे प्रमाण सभेत वाढवून दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. या सभेत खरबी (मां.) हे गाव सावंगा (बु.) ग्रामपंचायतमधून काढून येरड (बाजार) ग्रामपंचायत मध्ये समाविष्ट करण्याचा ठराव घेण्यात आला, मात्र हा ठराव घेतांना खरबी मांडवगड येथील जास्त नागरिक हजर नव्हते. त्यामुळे परस्पर घेतलेला हा ठराव आम्हाला मान्य नसल्याचे खरबी (मां.) येथील नागरिकांनी म्हटले आहे.

त्यामुळे हा ठराव रद्द करून या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी अशी मागणी खरबी वासीयांनी निवेदनाव्दारे केली आहे. निवेदन देतेवेळी खरबी येथील ग्रा. पं. सदस्य मिथुन शहा, माजी सरपंच सौ. दिपमाला भोयर, जितेंद्र तिरपुडे, अनिस खा पठाण, गोपाळ वाहने, योगेश बागडे, त्रिवेणी बागडे, गजानन ठाकूर, शारदा बागडे, राजेश ठाकूर, संतोष ठाकूर, रामभाऊ पाटील, सुनिल बावणे, सुभाष ठाकूर, मेघराज मेश्राम, रविंद्र वानखडे, सतिश भोयर, आकाश सुकरे, मनोज इरतकार, योगेश सावळीकर, देवरावजी मानकर, अण्णा तायवाडे, कुसुम वाहने, अमोल नवघरे, संतोष नवघरे, कय्युम खा पठाण, यांसह अनेकांची उपस्थिती होती.

# स्काऊट गाईड मेळाव्यात शिवाजी शाळेच्या पथकाचे सुयश



**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी, ( दि. 21 )** – जिल्हा परिषदेचा शिक्षण विभाग आणि भारत स्काऊट-गाईड यांच्या संयुक्त विद्यमाने भातकुली येथे नूकताच जिल्हा स्काऊट-गाईड मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्यात मोर्शीच्या श्री शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालयाच्या स्काऊट-गाईड पथकाने सहभाग घेतला होता. तीन दिवस चाललेल्या या मेळाव्यात विविध स्पर्धा घेण्यात आल्यात. त्यामध्येही शिवाजी शाळेचे पथक सहभागी झाले होते.

मेळाव्यात पार पडलेल्या नृत्य स्पर्धेत शिवाजी उच्च माध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला. तसेच स्कीलो ड्रामा या प्रकारात शाळेच्या विद्यार्थ्यांनी तृतीय क्रमांक मिळविला. भातकुली शहरातुन काढण्यात आलेल्या रॅली दरम्यान शाळेच्या पथकाने पथनाट्य सादर करुन स्काऊट विभागातून प्रथम क्रमांक प्राप्त केला. या मेळाव्यात स्काऊट कॅप्टन मनीष केचे, सारंग जाणे, गाईड कॅप्टन विजया रोकडे, वर्षा बावनकर, साठवणे, पुजा मेटकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी जिल्हा स्काऊट- गाईड मेळाव्यात मिळवलेल्या या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक श्रीकांत देशमुख, उपमुख्याध्यापक रवींद्र जावरकर, पर्यवेक्षक मिलिंद ढाकुलकर, उद्धवराव गिद, शिक्षक प्रतिनिधी अशोक चौधरी आदींनी कौतुक केले आहे.

# नवोपक्रम स्पर्धेचे विभाग व जिल्हास्तरीय पुरस्कार वितरित

## 23 जणांचा सन्मान

**जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचा उपक्रम**




**महासागर प्रतिनिधी**

**चांदुर रेल्वे, ( दि. 21 )** – शिक्षकांमध्ये नावीन्यपूर्ण अध्ययन व अध्यापनाला चालना मिळावी व विद्यार्थ्यांचे शिकणे सुलभ व्हावे या उद्देशाने जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था आणि पुण्याच्या राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने आयोजित केलेल्या नवोपक्रम स्पर्धेचा पुरस्कार वितरण समारंभ नुकताच अमरावती येथे पार पडला. यावेळी 23 नवोपक्रमकारांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य मिलिंद कुबडे हे होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून वरिष्ठ अधिव्याख्याता प्रेमला खरटमोल, अधिव्याख्याता डॉ. राम सोनारे, डॉ. दीपक चांदुरे. डॉ. इम्रान खान, डॉ विजय शिंदे यांची उपस्थिती होती. पाच गटात ही नवोपक्रम स्पर्धा घेण्यात आली. जिल्हास्तरीय नवोपक्रम स्पर्धेत पूर्व प्राथमिक गटात दहिगाव अंगणवाडी केंद्राच्या चैताली सावरकर यांनी प्रथम तर बऱ्हाणपूर अंगणवाडी केंद्राच्या कोमल ढगे यांनी द्वितीय क्रमांक प्राप्त केल्याबद्दल त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्राथमिक शिक्षक गटातून सालेपुर जिल्हा परिषद शाळेतील अनिल माकोडे यांना प्रथम, शिरपूरच्या जिल्हा परिषद शाळेतील वर्षा सूर्यवंशी यांना द्वितीय तर मल्हाराच्या जि. प. शाळेचे बबलू कराळे यांना तृतीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

चतुर्थ पुरस्कार सालनपूरच्या शाळेचे विनोद राठोड यांना तर पाचवा पुरस्कार आडगाव शाळेच्या कांचन खाडे यांना प्राप्त झाला. जिल्हा परिषद कन्या हायस्कूल अमरावती येथील वीरेंद्र ब्राह्मणे व जिल्हा परिषद शाळा बऱ्हाणपूरचे डॉ. निलेश इंगोले यांनाही सन्मानित करण्यात आले.

माध्यमिक गटात प्रथम क्रमांक तुकडोजी महाराज विद्यालयातील सुधीर केने यांनी पटकावला. वरुडच्या जनता हायस्कूलचे अतुल पडोळे द्वितीय तर टोम्पे महाविद्यालयातील प्रणिता देशमुख तृतीय पुरस्काराचे मानकरी ठरले. चतुर्थ क्रमांक चांदुर रेल्वेच्या मन्नालाल गुप्ता विद्यालयातील स्वप्नाली चौखंडे यांना तर पाचवा क्रमांक रामकृष्ण विद्यालय कांडलीचे विनायक ताठोड यांना मिळाला. कारंजाच्या शुभांगी पापळकर व उत्तमसराच्या माध्यमिक विद्यालयातील शितल भोपाळे यांना उत्तेजनार्थ पुरस्कार देण्यात आले. विभागस्तरीय नवोपक्रम स्पर्धेत विषय साधन व्यक्ती गटात चांदुर बाजारच्या गट साधना केंद्रातील प्रियदर्शनी झोड या प्रथम पुरस्काराच्या मानकरी ठरल्या. द्वितीय क्रमांक वाशीमच्या गट साधना केंद्रातील स्वाती नाचणे यांनी प्राप्त केला. तृतीय पुरस्कार मानोरा गटसाधना केंद्रातील मोतीराम जाधव यांना देण्यात आला. मूर्तिजापूर येथील प्रवीण मोहळ यांना चौथा तर कारंजा लाड येथील वैशाली शेटे यांना पाचवा पुरस्कार प्राप्त झाला. अधिकारी व पर्यवेक्षकीय गटात यवतमाळच्या जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे अधिव्याख्याता मधुमती सांगळे यांनी प्रथम पुरस्कार पटकावला. घाटंजीचे प्रभारी केंद्रप्रमुख अशोक शिंगेवार यांनाही सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन संशोधन विभाग प्रमुख व वरिष्ठ अधिव्याख्याता डॉ. विजय शिंदे यांनी तर आभार प्रदर्शन दीपक चांदुरे यांनी केले.

# मेळघाटातील 120 कंत्राटी शिक्षकांना पाच महिन्यांपासून मानधन नाही

**शिक्षक आर्थिक संकटात, शासनाप्रती असंतोष | जि.प. सीईओ संजिता मोहपात्रा यांना निवेदन**



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 21 )** – मेळघाटातील धारणी आणि चिखलदरा या पेसा अंतर्गत येणाऱ्या क्षेत्रात शासनाच्या आदेशावरून जिल्हा परिषद शाळांमध्ये 120 शिक्षकांना तात्पुरती नियुक्ती देण्यात आली आहे. या शिक्षकांना दरमहा वीस हजार रुपये मानधन देय्य असले तरी, सप्टेंबर महिन्यात नियुक्ती झाल्यापासूनच हे सर्व शिक्षक मानधनापासून वंचित आहेत. परिणामी या शिक्षकांमध्ये शासनाप्रती प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. या शिक्षकांनी जिल्हा परिषदेवर धडक देऊन मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्रा यांना निवेदन सादर केले व तात्काळ मानधन अदा करण्याची विनंती केली.

पेसा क्षेत्रातील दुर्गम भागात असलेल्या शाळांमध्ये तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती झाल्यानंतर ज्ञानदानाचे कार्य करणाऱ्या शिक्षकांना पाच महिन्यांपासून वेतन अदा न करणे हे अनाकलनीय, अन्यायकारक आणि अमानवीय असल्याचा आरोप महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने केला आहे. जिल्हा परिषदेकडे वारंवार मानधनासाठी पाठपुरावा करूनही त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याने हे शिक्षक मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत.

कुटुंबाचा चरितार्थ चालविताना या शिक्षकांसमोर मोठ्या अडचणी निर्माण झाल्या असून अनेक शिक्षक कर्जबाजारी झाले आहेत. 5 सप्टेंबर 2024 रोजी मेळघाटच्या पेसा क्षेत्रातील प्राथमिक व पूर्व माध्यमिक जिल्हा परिषद शाळांवर शिक्षक म्हणून नियुक्ती झाल्याचे आदेश या शिक्षकांना प्राप्त झाले होते.

त्यानुसार शाळांवर रुजू होऊन त्यांनी अध्यापनाचे कामही सुरू केले. पण पाच महिने होऊनही त्यांना मानधन अदा करण्यात आलेले नाही. शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष अजयानंद पवार व जिल्हा सरचिटणीस शैलेंद्र दहातोंडे यांच्या नेतृत्वात जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्रा व प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांची भेट घेऊन मानधनाची मागणी करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे मेळघाटातील या कंत्राटी शिक्षकांना पाच महिन्याचे प्रलंबित मानधन तात्काळ अदा करावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे, सरचिटणीस राजन बोरगावकर यांनी राज्याचे शालेय शिक्षण मंत्री, शिक्षण राज्यमंत्री, शिक्षण विभागाचे प्रधान सचिव, उपसचिव, शिक्षण आयुक्त, शिक्षण संचालक, उपसंचालक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली असल्याचे शिक्षक समितीचे प्रसिद्धी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

## दोन एकरातील आठ गुंठे हरभरा लंपास

**अमरावती** – दोन एकर शेतातील आठ गुंठे हरभरा अज्ञात चोराने लंपास केला. या घटनेची तक्रार शरद ओंकार कोरपे (72, रा. जैनपूर) यांनी 19 फेब्रुवारी रोजी येवदा पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. शरद कोरपे हे जैनपूर मारोती संस्थानचे विश्वस्त आहेत. त्यांनी शेतात कापून ठेवलेला 50 हजार रुपये किमंतीचा हरभरा चोराने लंपास केले आहे.

# माजी आमदार देवेंद्र भुयार यांच्यावर कारवाईची मागणी

**पत्रकाराशी अभद्र वर्तणूक केल्याबद्दल निषेध | पत्रकारांचे उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन**

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी, ( दि. 21 )** – अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार देवेंद्र भुयार यांनी पत्रकाराशी अभद्र वर्तणूक करुन त्यांना धमकावल्याच्या प्रकाराचा मोर्शी येथील पत्रकरांनी तीव्र निषेध नोंदविला आहे. बेताल वक्तव्य केल्याबद्दल देवेंद्र भुयार यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी पत्रकारांनी उपविभागीय अधिकारी प्रदीप पवार यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

वरुड येथील पत्रकार तुषार अकर्ते यांनी 14 फेब्रुवारीच्या वृत्तपत्रात वरुड–मोर्शी मतदार संघात आत्ता श्रेयाचे राजकारण अशा मथळ्याखाली बातमी प्रकाशित केली होती. त्यात देवेंद्र भुयार यांच्या नावाचा उल्लेख नसताना त्यांनी सदर पत्रकाराला फोनवरुन संपर्क साधून असभ्य भाषेत संभाषण केले. जातीचा उल्लेख करुन त्यांनी धमकीही दिली. नेहमीच वादग्रस्त विधाने करण्यासाठी देवेंद्र भुयार प्रसिद्ध आहेत. यावेळी त्यांनी पत्रकारालाच धमकावल्याने तालुक्यातील पत्रकारांमध्ये रोष निर्माण झाला आहे.

मोर्शी तालुका पावर ऑफ मीडिया, मोर्शी तालुका मराठी पत्रकार संघ, अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी या प्रकाराबद्दल माजी आमदार देवेंद्र भुयार यांचा निषेध केला आहे. जोपर्यंत भुयार संबंधित पत्रकाराला माफी मागणार नाही व सोशल मीडियावर टाकलेले बेताल वक्तव्य मागे घेणार नाही, तोपर्यंत हा लढा सुरूच राहील अशी भूमिका पत्रकारांनी घेतली आहे. उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन सादर करतेवेळी संजय गारपवार, कैलास ठाकूर, अंबादास सीनकर, गोपाल डहाके, संजय गारपवार, विजय सोमवंशी, अजय पाटील, अजित जोशी, गजानन हिरुळकर, बाबुराव पडोळे, दिनेश मिश्रा, शेखर चौधरी, शरद कनेर, संजय उल्हे आदी पत्रकार उपस्थित होते.




## सोळा हजाराची तुर लंपास

**अमरावती** – सरमसपुरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील नायगाव स्थित एका गोमादातून चोराने 16 हजार रुपये किमंतीचे तुरीचे पोते चोरून नेले. या घटनेची तक्रार जयदेवराव आडगोकर (45, रा. नायगाव) यांनी 19 फेब्रुवारी रोजी सरमसपूरा पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञाताविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. या चोरीच्या घटनेचा पुढिल तपास सरमसपूरा पोलिस ठाण्याचे ठाणेदाराच्या मार्गदर्शनात पोलिस करीत आहे.

# शिवचरित्राच्या संकल्पनेवर झेनिथ शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन

## विविध प्रसंगांचे प्रभावी सादरीकरण

## शिवजन्मापासून राज्याभिषेकापर्यंतचे दर्शन




**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी, ( दि. 21 )** – संपूर्ण राष्ट्रभर छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी होत असताना, मोर्शी तळणी येथील झेनिथ कॉन्सेप्ट स्कूल मध्ये शिवरायांना अभिवादन करण्यासाठी भव्य वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. शाळेने स्नेहसंमेलनासाठी 'वीर गाथा = छत्रपती शिवाजी महाराज यांचा वारसा' ही संकल्पना स्वीकारून त्यांच्या अद्वितीय जीवनप्रवासाचा गौरव केला. विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांच्या जन्मापासून राज्याभिषेकापर्यंतचा प्रवास जिवंत केला. पोवाडे, गीते, नृत्य, नाट्यकृती यांच्या सादरीकरणातून विद्यार्थ्यांनी शिवरायांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटनांचे प्रभावी दर्शन घडविले. मोर्शीतील सुप्रसिद्ध नृत्य दिग्दर्शक आतिफ खान आणि सागर यांनी उत्कृष्ट नृत्यरचना केली होती. ज्यामुळे संपूर्ण कार्यक्रमात अधिक रंगत आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. सावन देशमुख हे होते. मोर्शी अर्बन क्रेडिट को–ऑपरेटिव्ह सोसायटीचे उपाध्यक्ष अनंत नवघरे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. यावेळी मोर्शीच्या भारतीय महाविद्यालयाचे प्राचार्य संतोष आगरकर, समर्थ व नवनीत कोचिंग क्लासेसचे संचालक जीवन देशमुख, भारतीय महाविद्यालयाचे प्रा. विनोद गेडाम, सक्सेस कोचिंग क्लासेसचे संचालक आकाश नागपुरे, मोर्शी पंचायत समितीचे पाथरे सर आणि मन्सुरी सर उपस्थित होते. कार्यक्रमाला पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट सादरीकरणाचे सर्वांनी कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संचालक डॉ. दीपाली देशमुख यांच्या मार्गदर्शनात पूजा केचे, अश्विनी धोटे, कोमल येवले, दमिनी उकांडे, सुमित नागपुरे, अलीशा बनसोड, गौरव सगने, धर्मपाल शिरसाट, प्रगती देशमुख, मोनिका मॅडम, भारती ताई, प्राप्ती भुयार, कल्याणी केदार, पूजा मेटकर आणि रीना सिनकर या शिक्षकांसह प्राचार्य दिनेश फंदे यांनी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमाला प्रसाद शिक्षण संस्था अमरावतीचे अध्यक्ष प्रा. एम. टी. नाना देशमुख यांचे मार्गदर्शन व प्रेरणा लाभली.

# छत्रपती शिवाजी महाराज हे सर्वधर्मसमभावाचे प्रतीक

**शिवव्याख्याते सुभान अली यांचे प्रतिपादन ● अंजनगाव सुर्जीत शिवजयंती उत्साहात साजरी**

## शोभायात्रेने शहर वासियांचे लक्ष वेधले

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी, ( दि. 21 )** – आम्हाला छत्रपती शिवाजी महाराजांचा चुकीचा इतिहास सांगितला गेला. शिवाजी महाराजांचे नाव घेऊन दंगली घडविण्याचे प्रकार महाराष्ट्र आणि संपूर्ण देशात चालत होते. इतिहासाचा खोलवर अभ्यास केला तर छत्रपती शिवाजी महाराज हे सर्वधर्मसमभावाचे प्रतीक होते, असे आपल्या निदर्शनास येईल, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध शिवव्याख्याते शेख सुभान अली यांनी केले. अंजनगाव सुर्जी येथे मराठा सेवा संघ व सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने आयोजित शिवजयंती महोत्सवात



सुभान अली बोलत होते.

या कार्यक्रमाला आ. गजानन लवटे, बाळासाहेब गोंडचवर, मधुकर मेहेकरे, सुयोग खाडे, सीमा बोके, देविदास नेमाडे, सुरेंद्र टांक, प्रमोद दाळू, कपिल देशमुख, प्रदीप येवले, शरद कडू, सारिका मानकर, विकास घोगरे, सचिन गावंडे, प्रदीप देशमुख, राजू आकोटकर, अफसर बेग, रमेश सावळे, शफी नियाजी, गजानन कविटकर, राजेश शिंगणे प्रामुख्याने उपस्थित होते.

सुभान अली यांनी शिवाजी महाराजांच्या चरित्रातील अनेक पैलू उलगडून दाखवताना ते कसे सर्व धर्मीयांना सोबत घेऊन चालणारे राजे होते, हे सप्रमाण सिद्ध करून दाखवले.

शिवजयंती महोत्सवानिमित्त शहरातून छत्रपती शिवरायांची आकर्षक शोभायात्रा काढण्यात आली. शोभायात्रेतील विविध देखाव्यांनी शहरवासीयांचे लक्ष वेधून घेतले होते. गणेश नगर येथून या शोभा यात्रेला प्रारंभ झाला. नगरपरिषद विद्यालयाच्या प्रांगणात या शोभायात्रीची सांगता झाली. खासदार बळवंत वानखडे व आमदार गजानन लवटे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. शिवजयंती महोत्सव समितीद्वारे आयोजित निबंध स्पर्धेचे बक्षीस वितरित करण्यात आले. या कार्यक्रम व शोभायात्रेमुळे संपूर्ण अंजनगाव सुर्जी शहर शिवमय झाले होते. कार्यक्रमाचे संचालन स्मिता घोगरे तर आभार प्रदर्शन कविता येवले यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड, वीर भगतसिंग विद्यार्थी परिषदेच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# सहा हजार ग्राहकांचा वीज पुरवठा केला खंडित

## फेब्रुवारी महिन्यात महावितरणची कारवाई

**231 कोटी रूपयाच्या वीजबिलाच्या वसुलीसाठी महावितरणने केली मोहिम तीव्र**





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 21 )** – परिमंडळाअंतर्गत 231 कोटी 52 लाख वीजबिलाच्या वसुलीसाठी महावितरणने मोहिम तीव्र केली असून महावितरणच्या मोहिमेत वीजबिल भरण्याला प्रतिसादच न देणाऱ्या परिमंडळातील 6 हजार 146 वीज ग्राहकांचा वीज पुरवठा खंडित करण्यात आला आहे. एकुण थकबाकी आणि पुनर्जोडणी शुल्क भरल्याशिवाय या ग्राहकांचा वीज पुरवठा पुर्ववत करण्यात येणार नाही. त्यामुळे महावितरणची कटू कारवाई टाळण्यासाठी वीज ग्राहकांनी वीज बिल भरून सहकार्य करण्याचे आवाहन मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी यांनी केले आहे.

परिमंडळाअंतर्गत विविध वर्गवारीतील सुमारे 15 लाख ग्राहकांना महावितरणकडून वीज पुरवठा करण्यात येतो. तथापि जानेवारी अखेर कृषी ग्राहक, पाणीपुरवठा व पथदिव्याचे ग्राहक वगळून परिमंडळातील घरगुती, वाणिज्यिक, औद्योगिक आणि इतर वर्गवारीतील वीज ग्राहकांकडे 231 कोटी 52 लाख रूपये वीजबिलाचे थकल्यामुळे महावितरणपुढे आर्थीक समस्या निर्माण झाली आहे. थकबाकीचा आकडा मोठा आहे. त्यामुळे महावितरणने महिन्याच्या पहिल्या दिवसापासूनच वीज बिल वसुली मोहिम अधिक तीव्र केली आहे.

परिमंडळा अंतर्गत 231 कोटी 52 लाख रूपयाच्या थकीत विजबिलामध्ये अमरावती जिल्ह्यातील 110 कोटी 75 लाखाचा समावेश आहे. तथापि 20 फेब्रुवारी पर्यंत 38 कोटी रूपयाचा वीजबिलाचा भरणा करण्यात आला आहे. त्याचबरोबर यवतमाळ जिल्ह्यात 120 कोटी 77 लाख रूपयाच्या थकबाकीपोटी 25 कोटी रूपयाचा वीज बिल भरणा करण्यात आला आहे. परंतू महिन्याच्या उरलेल्या दहा दिवसात मोठी थकबाकी वसुल करावी लागणार असल्याने महावितरणने विजबिल वसुली मोहिमेला गती दिली आहे.

महावितरणच्या वीजबिल भरण्याला प्रतिसादच मिळत नसल्याने फेब्रुवारी महिन्याच्या 20 दिवसात परिमंडळातील 6 हजार 146 ग्राहकाचा वीज पुरवठा खंडित करण्यात आला आहे. यामध्ये अमरावती जिल्ह्यातील 3 हजार 88 आणि यवतमाळ जिल्ह्यातील 3 हजार 58 ग्राहकाचा समावेश आहे. वीज ग्राहकांनी वेळेत वीजबिल भरणे आवश्यक आहे. तथापि महावितरणची कारवाई झाल्यानंतर संबंधित ग्राहकांचा वीज पुरवठा खंडित केल्याची नोंद महावितरणच्या ऑनलाईन प्रणालीत करावी लागते. त्यामुळे सींगल फेज ग्राहकांना रूपये 310 अधिक जीएसटी आणि 3 फेज ग्राहकांना रूपये 520 अधिक जीएसटी पुनर्जोडणी शुल्क भरावेच लागणार त्यामुळे होणार मनस्ताप,आर्थीक दंड आणि वेळेचा अपव्यय टाळण्यासाठी वीज ग्राहकांनी वेळेत वीजबिल भरून सहकार्य करावे.

# शिवजयंती निमित्त जेवड नगरात पुस्तक व प्रसादाचे वितरण

## नवयुवक मित्र मंडळाचा उपक्रम

**महाासगर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 21 )** – स्थानिक जेवड नगर येथील नवयुवक मित्र मंडळाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी शिवाजी महाराज आणि माँ जिजाऊ यांच्या जीवन चरित्रावर आधारित पुस्तकांचे वितरण मंडळाच्या वतीने करण्यात आले.

कार्यक्रमाला बडनेराचे आमदार रवी राणा, सामाजिक कार्यकर्ते मनीष भोंगळे, रुपेश मोकळकर प्रामुख्याने उपस्थित होते. त्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून वंदन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज आणि जिजाऊ माँ साहेबांच्या जीवनावर आधारित पुस्तकांचे वितरण करण्याची संकल्पना वॉर या वन्यजीव संस्थेचे अध्यक्ष निलेश कांचनपुरे यांनी मांडली होती. प्रसाद वितरित करून या कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रिया कांचनपुरे, लता दहाट, काजल कोरडे, दुर्गा कंचनपुरे, आरती कंचनपुरे, मंगला कोकाटे, यमुना मुल, गायत्री ठाकरे, रंजना खिराडे, पुनम डकरे, अश्विनी उंबरकर, पुष्पा गवळी, अजय पोकळे, आकाश गवळी, अभिजीत खिराडे, अजय कंचनपुरे, विजय रायचंद, विजय कोरडे, मनोज राऊळकर आदींनी परिश्रम घेतले.




# बालांगण

## विक्रमांसाठी काहीपण...

गंमत जंमत

मित्रमैत्रिणींनो, प्रत्येकाला नवेनवे विक्रम करायची हौस असते. त्यासाठी त्यांची काहीही करायची तयारी असते. काही किस्से तर अजब असतात. कोणी लांब केस वाढवतात. कोणी लांब नखे वाढवतात. तर कोणी लोखंडाचे तुकडे गिळतात. म्हणून यांच्या असामान्य कामगिरीची नोंद गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड घेते. आजवर या बुकमध्ये हजारो विक्रमांची नोंद झाली आहे.




✽ चेन्नईमध्ये कप केकचा सर्वात उंच मनोरा तयार करण्यात आला. ४१ फूट आठ इंच उंचीचा हा मनोरा लक्षवेधी ठरला. १८,८९८ कप केक्सपासून हा मनोरा उभारण्यात आला होता. यातल्या प्रत्येक कप केकचं वजन ७० ग्रॅमच्या आसपास होतं. या मनोऱ्याचं एकूण वजन १.४ टन इतकं भरलं.

✽ इंग्लंडच्या ज्युली फेल्टॅन या जगातल्या सर्वात लांब पावलं असणाऱ्या महिला आहेत. त्यांच्या उजव्या पावलाची लांबी ३२.९ सेंटीमीटर तर डाव्या पावलाची लांबी ३२.७ सेंटीमीटर आहे. त्यांच्या पायात बसणारी पादत्राणं मिळत नसल्याने त्यांना पुरुषांची पादत्राणं घालावी लागतात.

✽ सिरियाच्या मेरी इलियासने अनोखा विक्रम केला आहे. त्यांनी कुत्र्यांची चित्र असणाऱ्या वस्तूंचा साठा केला आहे. त्यांच्याकडे अशा १४९६ वस्तू आहेत. यात कुत्र्यांचे पुतळे, किचेन, चादरी, उशीचे अभ्रे, मग आणि दागिने यांचा समावेश आहे. त्यांचं नाव गिनिज बुकमध्ये नोंदवण्यात आलं आहे.

✽ मुंबईतल्या एका शाळेच्या मैदानात ४०० तरुणांनी कपडे धुण्याचे धडे घेतले. एकाच वेळी एवढ्या तरुणांनी कपडे धुण्याचे धडे घेणं हा जागतिक विक्रम आहे. याची दखल गिनिज बुकने घेतली.



पुरुषांनीही घरातल्या कामांमध्ये हातभार लावावा, यासाठी एका कंपनीने मोहीम सुरू केली आहे. त्या अंतर्गत कपडे धुण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. महिलांबरोबर पुरूषांचा ही घरकामात हातभार असावा हा मूळ उद्देश होता.

## श्रीमंती थाटाचा लक्झम्बर्ग

सफर देशांची

लक्झम्बर्ग हा युरोप खंडातला छोटासा देश आहे. क्षेत्रफळ कमी असलं तरी त्या देशाला समृद्ध सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा लाभला आहे. बेल्जियम, जर्मनी आणि फ्रान्स हे लक्झम्बर्गचे शेजारी. ९९९ चौरस मैल एवढाच त्याचा आकार आहे. पश्चिम युरोपातल्या या देशाचा आकार अमेरिकेतलं सर्वात छोटं राज्य 'ऱ्होड आईसलँड'पेक्षाही कमी आहे. एवढासा देश असूनही वैशिष्ट्य म्हणजे देशातील नागरिक अतिशय मेहेनती आहेत. चारही बाजूंनी जमिनीने वेढलेल्या आणि बेटासारख्या असणाऱ्या या देशात घनदाट जंगलं, टेकड्या आणि कमी उंचीच्या पर्वतरांगा आहेत. देशाच्या उत्तर भागातील जमीन शेतीसाठी फारशी उपयोगी नाही, मात्र दक्षिणेकडचा भाग त्यादृष्टीने 'सुजलाम सुफलाम' आहे.


'हौटे श्युअर' हा या देशातला सर्वात मोठा तलाव आहे. येथील हवामान सर्वसाधारण असते. कोणत्याही ऋतुचा फारसा परिणाम नेहमीच्या वातावरणावर पडत नाही. लक्झम्बर्गच्या डोंगराळ भागात शाकाहारी तसेच काही हिंस्र प्राणी आढळतात. कंद प्रजातीच्या भाज्या मुख्यत्वेकरून येथे पिकवल्या जातात. जर्मन आणि फ्रेंच भाषा मुख्यत्वे बोलल्या जातात. या देशाची स्वतःची अशी कोणती भाषा नाही. एक आदर्श देश म्हणून या देशाकडून बऱ्याच गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. देशाचे दरडोई उत्पन्न उच्चतम ठेवण्यासाठी प्रत्येक नागरिक सदैव प्रयत्नशील असतो. शेजारी राष्ट्रांशी अतिशय सौदार्हपूर्ण संबंध ठेवण्याच्या दृष्टीने हे राष्ट्र नेहमी प्रयत्नशील असते.




## कसे असतात बॅक्टेरिया?

हेल्थ वेल्थ


या पृथ्वीवरचा सर्वात छोटा जीव असला तरी कधी अति संहारक तर कधी अतिशय उपयोगी बॅक्टेरिया हा सजीव, सगळीकडे असतो. चराचरात तो सगळ्या ठिकाणी आढळतो. आपल्या भोवताली देखील असंख्य बॅक्टेरिया असतात. इलेक्ट्रीक वस्तू, खण्याण्पियाचे जिन्नस अशा प्रत्येक ठिकाणी हे सजीव अगदी आरामात रहातात. म्हणूनच स्वच्छतेला प्राधान्य देण्याची अत्यंत आवश्यकता असते. जेवताना हात धुण्याचा सल्ला दिला जातो. काही बॅक्टेरिया आपल्या आरोग्यासाठी चांगले असतात तर काहींमुळे विविध आजार होतात.



बॅक्टेरिया हे एकपेशीय सजीव आहेत. या पेशीमध्ये कॉम्प्युटरमधल्या प्रोग्रामप्रमाणे काम करणारे डीएनए असतात. बॅक्टेरियांना जगवण्यासाठीची सगळी माहिती या डीएनएमध्ये समाविष्ट असते. या पेशीभोवती कठीण भिंत असते. यामुळे बॅक्टेरियांचं रक्षण होतं. काही बॅक्टेरियांना बाहेरच्या बाजूला कवच असतं. त्याला 'पिली' असं म्हणतात. हालचालीसाठी त्यांच्या शरीरात लांब धाग्यासारखे अवयव असतात. त्यांना शास्त्रीय भाषेत 'फ्लॅगेल्ला' असं म्हणतात.

हे सजीव समुहाने रहातात. त्यांची संख्या झटपट वाढते. सध्या पृथ्वीवर दहा हजार प्रजातींचे बॅक्टेरिया आहेत. बॅक्टेरियांची तीन विभागांमध्ये विभागणी केली जाते. 'कोक्की बॅक्टेरिया' गोलाकार असतात. 'बॅसिली' बॅक्टेरियांचा आकार सरळ असतो. 'स्पायरल बॅक्टेरिया' कॉर्कस्क्रू पास्तासारखे दिसतात.

ठिपके जुळवा



दोस्त हे मस्त

### जग हत्तींचे



हत्ती हा भूतलावरचा सर्वात महाकाय प्राणी आहे. शिवाय तो शुध्द शाकाहारी आहे. दिसायला अतिशय शांत पण राग अनावर झाल्यास अतिशय संहारक असा प्राणी म्हणून प्रसिद्ध आहे. पाण्यामध्ये डुंबणे हा त्याचा आवडता छंद आहे. सहसा कळपाने राहणे पसंद करतो. सिंहाची ओळख जंगलाचा राजा म्हणून असली तरी खरी ऐट ही हत्तीचीच असते.

खादाडी

### थंड घ्या पण तब्येतीला.

नुकतीच हिवाळा ऋतु संपून उन्हाळ्याची चाहुल लागली आहे. आत्तापासूनच रसवंती गृहांकडे नागरिकांची पाउले वळू लागली आहेत. तसा पिताना थंडगार वाटणारा उसाचा रस उष्ण असल्याने त्याला पर्याय म्हणूनच नीरेला जास्त मागणी असते. निरा हे बहूगुणी पेय आहे. पित्तशामक शिवाय प्रकृतीला पाचक म्हणून निरेला ग्राहकांची प्रथम पसंती दिसून येते.

उच्चभ्रु ग्राहकांची नेहमीप्रमाणे शितपेयांना मागणी आहेच. अशी शितपेये पिताना तार्त्पुता थंडावा मिळत असला तरी काहीवेळाने घशाला कोरड पडते. कोंकणातील प्रसिध्द सोलकढी हे देखील जेवणानंतर शरीराला पाचक आणि पोषक म्हणून उत्तम पेय आहे.

स्टडी टिप्स


### अभ्यासाची विभागणी करा



मुलांनो, तुम्हाला आता शाळेचे वेध लागले असतील. बऱ्याच मुलांच्या शाळा सुरूही झाल्या असतील. त्यामुळे सुट्टी मागे सोडून अभ्यासाला लागायला हवं. भरपूर अभ्यास असेल तर काळजी करू नका. अभ्यासाची विभागणी करा. परीक्षेला तीन धडे असतील तर एका वेळी एक धडा समजून घ्या. त्यावरची उत्तरं तयार करा. मगच पुढे जा. यामुळे तुमच्यावर ताण येणार नाही.

योगा टाईम

### लाभदायी ताडासन



योगासनांचे अनेक फायदे आहेत, तसेच योगासने ही अनेक प्रकारची आहेत. शरीर निरोगी आणि सशक्त राहण्यासाठी नियमित योगासनांचा सराव असणे आवश्यक आहे. ताडासन हे त्यापैकीच एक आसन म्हणावे लागेल. शरीराला जास्त ताण न घेता सहज करता येईल.

## जपा नखांचे आरोग्य

जाणून घ्या

हाताप‍ायांच्या नखांची स्वच्छता किती महत्त्वाची आहे हे तुम्ही जाणताच. नखांमध्ये घाण अडकलेली असेल तर अन्नाद्वारे ती पोटात जाते आणि विविध आजार उद्भवतात. म्हणूनच आई-बाबा किंवा शिक्षक आपल्याला वारंवार नखं स्वच्छ ठेवण्याचा, वेळोवेळी कापण्याचा सल्ला देत असतात. चला आपण आज नखं स्वच्छ आणि निरोगी ठेवण्याचे काही सोपे उपाय बघू या.



आहारात पौष्टिक घटक असतील तर शरीरातील अन्य अवयवांप्रमाणे नखंही निरोगी राहतात. आहारातील लोहाची पर्याप्त मात्रा नखांच्या आरोग्यासाठी आवश्यक असते. म्हणूनच लोहयुक्त आहार घ्यावा. यासाठी तुम्ही आहारात बीन्स, सोया, मासे, लाल मांस, अंड, सालासह धान्य, बेदाणे, खजूर आदींचा वापर वाढवू शकता. बीटामध्येही नखांना उपकारक ठरेल अशी कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डी ची पर्याप्त मात्रा असते. म्हणूनच दिवसातून एकदा बीटाचं सेवन करावं.

नखं स्वच्छ, बळकट आणि आरोग्यसंपन्न रहावी यासाठी त्यांची निगा राखायला हवी. यासाठी काही उपाय करता येतील. एका बाऊलमध्ये कोमट पाणी घ्या. त्यात लिंबाचा रस मिसळा. एका कॉटन बॉलनं हे पाणी नखांवर पसरवून हलक्या हातानं मॉलिश करा. आठवड्यातून एकदा हा उपाय केला तरी, नखांवर डाग राहणार नाहीत त्याचप्रमाणे नखांमध्ये घाण राहणार नाही. नखं बळकट करण्यासाठी गरम पाण्यामध्ये ऑलिव्ह ऑईलचे काही थेंब टाकून काही काळ त्यात बोटं बुडवून बसणं हा देखील एक चांगला उपाय आहे. विशेषत: वारंवार नखं तुटण्याचा अथवा दुभंगण्याचा त्रास असेल त्यांनी हा उपाय अवश्य करावा. नखं गोलाकार आकारात कापावी. नखांना वेगवेगळे शेप देण्याच्या भानगडीत पडू नये.

## कसे असतात सी टर्टल?

मुके सोबती

मुलांनो, तुम्हाला कासव बघायला आवडतं ना! काही कासवं जमिनीवर राहतात तर काही पाण्यात राहतात. काही जमीन आणि पाणी अशा दोन्ही ठिकाणी राहतात. पाण्यातल्या कासवांची एक जात म्हणजे 'ग्रीन सी टर्टल'. चला, आज त्यांच्या जगात भ्रमंती करुन येऊ.

✽ या कासवांच्या पिलांची लांबी फक्त पाच सेंटीमीटर असते. पण त्यांची लांबी पाच फुटांपर्यंत वाढू शकते. तसंच त्यांचं वजनही ३०० किलोपर्यत वाढतं. यामुळेच समुद्री कासवांमधलं 'ग्रीन सी टर्टल' हे आकारानं सर्वात मोठं कासव आहे. या कासवाच्या पाठीवरचं कवच करड्या रंगाचं असतं. त्वचेच्या हिरवट रंगामुळे या कासवांना ग्रीन सी टर्टल असं म्हटलं जातं.



धोक्याची सूचना मिळाल्यावर अन्य कासवं तोंड आत घेतात. पण ग्रीन सी टर्टल्स मात्र अशाप्रकारे आपलं तोंड आत घेत नाहीत.

✽ ही कासवं बराच काळपर्यंत श्वास रोखून धरू शकतात. ही कासवं शीतरक्ती म्हणजेच थंड रक्ताची असतात. पाण्याच्या तापमानामुळे त्यांना आपला श्वास रोखून धरता येतो. पाणी थंड असेल तेवढा ते श्वास रोखून धरू शकतात. ही कासवं पाण्यामध्ये अत्यंत जलद गतीनं पोहू शकतात. मात्र जमिनीवर त्यांची गती कमी होते. त्यामुळेच ही कासवं सहसा जमिनीवर येत नाहीत. ही कासवं जमिनीवर फक्त अंडी घालण्यासाठी येतात. दर दोन ते चार वर्षांनी कासवांची मादी अंडी घालते. एकावेळी साधारणपणे १०० ते २०० अंडी घातली जातात. ✽ ग्रीन सी टर्टलच्या दोन जाती असतात. एक म्हणजे 'अटलाटिक ग्रीन टर्टल' आणि 'इस्टर्न पॅसिफिक ग्रीन टर्टल'. खेकडे, जेलीफिश हे या कासवांचं अन्न असतं.

✽ ग्रीन सी टर्टलचा समावेश नामशेष होणाऱ्या प्रजातींमध्ये करण्यात आला आहे. शिकारीमुळे त्यांची संख्या झपाट्याने कमी होत आहे. त्यामुळे त्यांच्या संरक्षणासाठी प्रयत्न करणं गरजेचं आहे.





## करिअरच्या विविध संधी

कोण होणार?

दहावीनंतर करिअर कोणते निवडावे हा मुलांसमोर गहन प्रश्न असतो. बहुतांश मुलांचा एम.बी.ए., अकाउंट्स, फायनान्स अशा क्षेत्रांकडे कल असतो. सीए म्हणजे चार्टर्ड अकाउंटन्सी हा आभ्यासक्रम अतिशय अवघड मानला जातो. तसाच सीएमए म्हणजे कॉस्ट अँड मॅनेजमेंट अकाउंटन्सी हा देखील महत्वाचा आभ्यासक्रम मानला जातो. पुढील संधींच्या दृष्टिने ही क्षेत्र महत्वाची मानली जातात. शास्त्र शाखेशिवाय ईतरही आभ्यासक्रमात करिअरच्या दृष्टिने विविध संधी आहेत, हे बऱ्याच जणांना माहीत नसते, यामुळे विद्यार्थ्यांना गोंधळ उडू शकतो. अशावेळी पालकांनी त्यानां मार्गदर्शन करणे आवश्यक असते.

सीए परीक्षांचं आयोजन 'इन्स्टिटयूट ऑफ चार्टर्ड अकाउंट्स ऑफ इंडिया' ही संस्था करते तर 'इन्स्टिटयूट ऑफ कॉस्ट अकाउंट्स ऑफ इंडिया' ही संस्था सीएमए अभ्यासक्रमाचे नियम ठरवते. सीएला अकाउंटिंग, ऑडिटिंग आणि टॅक्सेशन या विषयांची सगळी माहिती असते. इंटरनल ऑडिट, स्टॅच्युटरी ऑडिट, डायरेक्ट आणि इनडायरेक्ट टॅक्सेशन, गुंतवणुकीबाबतचे निर्णय घेण्यात सीए महत्त्वाची भूमिका बजावतात. सीएमएला कॉस्ट आणि आर्थिक व्यवस्थापनाच्या माध्यमातून कंपनीचा खर्च आणि उपलब्ध साधनांमध्ये संतुलन साधायचं असतं. कंपनीशी संबंधित प्रकल्पातले फायदे आणि तोटे जाणून घेण्याचं काम सीएमए करतात. भावी करिअर निवडीसाठी गुरूजनही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात.

चित्र रंगवा



## धाडसाला आवर घाला

जीवाला जपा

छोट्यांनो, आधुनिक जमाना हा विविध प्रकारच्या शोधांबरोबरच विविध स्टाईल्सचा आहे. कपड्यांपासून ते किंमती वाहनांपर्यंत रोज नवनवीन शोध लागतात तसेच कुठल्या ना कुठल्या स्टाईल्स दिसून येतात. आपला विषय हा सध्याच्या सेल्फी फोटो आणि रील्स या आधुनिक स्टाईलबद्दल आहे. कुठल्याही समारंभात अथवा सहलीच्या ठिकाणी जा, तरूणवर्गच नाही अबालवृध्दांना सेल्फीचे आकर्षण दिसून येते. मित्रमैत्रिणींचा घोळका असेल किंवा एखादे कुटुंब असेल, एका छोट्याशा फोटोमध्ये निसर्गाबरोबरच सर्व उपस्थितांचा सेल्फी घ्यायचा मोह कोणालाच आवरत नाही.



अशीच व्हिडिओ रील बनवायची नवी स्टाईल तरुण वर्गामध्ये निर्माण होऊ लागली आहे. पण कैक वेळेस या स्टाईल आणि त्यांचा मोह तरुणवर्गासाठी जीवघेणा ठरत आहे. सहलीच्या ठिकाणी खोल दरीच्या कडांवर असे सेल्फी घेत असताना कैक युवक-युवतींचे बळी गेले आहेत. तरुण मुले काही क्षणाचे धाडस दाखवण्यासाठी जीवाची पर्वा न करता भरधाव मोटारसायकलींवरून स्टंट्स करताना दिसतात. परमेश्वराने दिलेले बहुमोल आयुष्य अशी क्षणिक चेष्टा करून मातीमोल करण्याला धाडस नाही तर शुद्ध वेडेपणा म्हणतात.

## ओळखा पाहू

जिज्ञासा

१) जागतिक पर्यावरण दिन कधी असतो?
२) भारताच्या नव्या अर्थमंत्री कोण?
३) आंतरराष्ट्रीय योग दिवस कधी असतो?
४) लढायांचं शहर कोणाला म्हटलं जातं?
५) व्हॅली ऑफ द किंग्ज कुठे आहे?
६) एकदिवसीय क्रिकेटचा विश्वचषक सर्वाधिक वेळा जिंकणारा देश कोणता?
७) जगातला सर्वात मोठा मानवनिर्मित कालवा कोणता?
८) युरोपियन युनियनच्या सदस्य देशांमध्ये कोणतं चलन वापरलं जातं?
९) जगातला दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा खंड कोणता?
१०) सर्वात जुनं राष्ट्रगीत कोणत्या देशाचं आहे?

उत्तरं : १) पाच जून २) निर्मला सीतारमण ३) २१ जून ४)पानीपत ५) इजिप्त ६) ऑस्ट्रेलिया ७) सुएझ कालवा ८) युरो ९) आफ्रिका १०) जपान

## पान १ वरून....

### फुरोगामी काहीही म्हणो...

मराठी साहित्याचा उगम कुठे झाला? अमूक साली शाळा निघाली आणि माणसे शिकायला लागली, हे आमचे आधुनिक पांडित्य झाले. ज्या दिवशी आईने पहिली ओवी आपल्या बाळासाठी गायली, त्या दिवशी मराठी भाषा जन्माला आली.

*'कांदा मुळा भाजी, अवघी विठाबाई माझी*
*लसूण मिरची कोथिंबिरी, अवघा झाला माझा हरी',*

असा सांगणारा आमचा सावता माळी. त्याने ही मराठी भाषा जिवंत ठेवली. आमचा हा विठू सर्वांना आपल्या पदराखाली व सावलीखाली घेणारा आहे. या संतांच्यामध्ये अंत्यजन म्हणजे आज ज्याला आपण बीसी व ओबीसी म्हणतो, ही सगळी मंडळी त्याचे परमभक्त आहेत. ते कुठल्याही शाळेत शिकले नाहीत. त्यांना कुणीही शिकवले नाही. तरीही ते मराठीत काव्य करत होते. याचा अर्थ मराठी केवळ लिखित स्वरुपात नाही, ती बोलीतून निर्माण झाली, बोलीतून पसरली. आणि म्हणून शिवाजी महाराजांना खेड्यापाड्यातील मावळे मिळाली. ही भाषा त्यांच्यामुळे जिवंत राहिली. कोणतीही भाषा ही संस्कृतीचे बलस्थान असते. त्यामुळे भाषा ही तोडणारी नव्हे तर जोडणारी असली पाहिजे.

आधुनिक पद्धतीच्या लोककलेचे शिक्षण देणाऱ्या एका संस्थेतील कार्यक्रमात बाईने कपाळाला कुंकू लावणे कसे आवश्यक आहे, त्याला विज्ञानाची शास्त्रीय जोड कशी आहे हे सांगण्यात आले. परंतु, कुंकवाच्या दाब बिंदूमुळे स्त्रियांचे मानसिक स्वास्थ ठीक होत असेल तर मानसिकदृष्ट्या जास्त स्वास्थ्याची गरज कोणाला आहे. लग्न झालेल्या बायकांना की विधवांना?. कारण मानसिकदृष्ट्या त्या जास्त असुरक्षित आहेत. मग विधवांना आम्ही कुंकू लावायचीच मनाई करणार असू तर या सायंटिफिक रिझनला अर्थ काय? त्यामुळे याला आम्ही फेक सायन्स, स्यूडो सायन्स, म्हणणार का? असा प्रश्न करत विज्ञानाच्या नावावर खोट्या गोष्टी पसरवण्याचा उद्योग सुरू असल्याचा घणाघात डॉ. तारा भवाळकर यांनी केला.

आज ज्या पध्दतीने माणसांचे जीवन चालले आहे, त्या पध्दतीमध्ये जुने जाऊद्या मरणालागुनी, जाळुनि किंवा पुरुनी टाका असा प्रकार दिसतो. परंतु, असे एकीकडे म्हणायचे आणि एकीकडे जुन्याचाच पुन्हा पुन्हा वापर कसा योग्य आहे हे सांगण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यामुळे विशेषतः लोकांना निरनिराळ्या कर्मकांडात गुंतवून ठेवण्याचे उद्योग, देवाधर्माच्या नावावर, संस्कृतीच्या नावावर पुन्हा पुन्हा चाललेले दिसतात. त्याच्यामध्ये तथाकथित शिक्षित स्त्रिया, मी तथाकथित म्हणते मी सुशिक्षित म्हणत नाही. तथाकथित शिक्षित स्त्रिया त्याच्यामध्ये अडकतात. लोकसंस्कृतीतल्या आणि संत स्त्रियांनी जेवढा विचार केला, स्वतःच्या जगण्याचा तेवढा विचार या शिक्षित बाया करीत नाहीत. स्वतःला पदवीधर म्हणवतात, उच्चशिक्षित म्हणवतात परंतु, आपण हे का करतो आहोत हे कर्मकांड, या कर्मकांडाचा विचार करत नाहीत असे दिसते. विधी श्रध्देने केला जातो आणि ज्यावेळेला ज्या विध्यात्मकतेतली श्रद्धा बाजूला होते. त्यावेळेला जे उरतं नुसतं कर्म केलं जातं. नुसते विधी केले जातात त्याला कर्मकांड असं म्हणतात. की नुसतं करत रहायचं ते अमुक करा, तमुक करा, तमुक करा आणि मग त्याला साइंटिफिक रिझन देण्याचा प्रयत्न करायचा असा प्रकार सुरू आहे. छद्म विज्ञान म्हणजे आता लोककलांच्यामध्ये सुध्दा ही भानगड आलेली दिसते आहे, असे डॉ. भवाळकर म्हणाल्या.

### शिंदेंना धमकी प्रकरणाचे...

करण्यात आला होता. मंगेश अच्युतराव वायाळ (३५), अभय गजानन शिंगणे (२२) दोघेही रा. देऊळगाव मही, ता. देऊळगाव राजा, जि. बुलढाणा, अशी ताब्यात घेण्यात आलेल्यांची नावे आहेत. मंगेश हा ट्रक चालक असून, अभयचे मोबाईल शॉप असल्याची माहिती समोर आली आहे. प्राथमिक तपासानुसार, या दोघांनी आपसातील वादातून एकमेकांवर कुरघोडी करण्याच्या उद्देशाने हे कृत्य केले असावे, असा पोलिसांचा प्राथमिक संशय आहे. तथापि, या प्रकरणाचा सखोल तपास करण्यात येत आहे. या दोघांची मुंबईत बारकाईने चौकशी करण्यात येत असून धमकी देण्या मागील त्यांचा हेतू काय, त्याचे कारण काय याची माहिती घेण्यात येत आहे. या चौकशीचा तपशील मिळाला नाही.

गोरेगाव पोलिसांनी दोघांना ताब्यात घेऊन मुंबईला नेले. तेथे त्यांची चौकशी सुरू आहे. सार्वजनिक सेवकाला त्याच्या कर्तव्यापासून परावृत्त करण्यासाठी धमकी दिल्याच्या आरोपाखाली ही कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणात अभयने मंगेशच्या मोबाईलचा वापर केल्याचे पोलीस तपासात उघड झाले आहे. मात्र, हा मुद्दा संवेदनशील असल्याने पुढील तपासात पोलिसांची भूमिका काय असेल, याकडे लक्ष लागले आहे.

### हलक्यात घेणाऱ्यांचा...

देशातील ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी हा पुरस्कार दिला आहे. एक मराठी माणूस दुसऱ्या मराठी व्यक्तीला पुरस्कार देतो, आणि महादजी शिंदे सारख्या पराक्रमी महापुरुषाच्या नावाने पुरस्कार दिला जातो, ही मोठी गोष्ट आहे. त्यावरही टिका करणे म्हणजे त्यासंदर्भात ही लोकं किती जळले, किती जळणार, एक दिवस जळून खाक होणार, असेही एकनाथ शिंदे म्हणाले. या प्रकरणी या लोकांकडून शरद पवार यांचाही अपमानीत करण्यात आले. या लोकांनी साहित्यिकांना दलाल म्हणून त्यांचा अपमान केला. महादजी शिंदे यांच्या वंशज यांचाही अपमान केला. कधी तरी सुधरा. माज्यावर कितीही आरोप करा, शिव्या द्या, जोवर जनता आमच्या सोबत आहे काहीच होणार नाही, असेही एकनाथ शिंदे यांनी अप्रत्यक्षरित्या उद्धव ठाकरे गटाला सुनावले.



*नवी दिल्ली येथे आयोजित अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या पहिल्या दिवशी ग्रंथदिंडी करण्यात आली. यावेळी अनेक नामवंत साहित्यिक सहभागी झाले होते.*

# पुन्हा गँगवार! एकाच दिवशी दोन हत्याकांड

**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २१ :**

राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे गृहशहर अशी ओळख असलेल्या उपराजधानी नागपुरात गेल्या १२ तासात दोन हत्याकांड उघडकीस आले.

कुख्यात गुन्हेगारांनी दोन्ही हत्याकांड घडून आणल्यामुळे उपराजधानीत एकच खळबळ उडाली आहे. तब्बल ३० पेक्षा जास्त गुन्हे दाखल असलेल्या एका गुंडाने इमामवाडा परिसरात एका युवकाचा खून केला तर यशोधरानगरातील घटनेत एका गुंडाने लग्न समारंभातच एका युवकाचा चाकूने भोसकून खून केल्याची घटना उघडकीस आली. या दोन्ही हत्याकांडांच्या घटनांमुळे उपराजधानीतील कायदा व सुव्यवस्था धोक्यात आली आहे.

पहिल्या घटनेत, इमामवाड्यातील कुख्यात गुंड सोनू उर्फ दीपक विजय वासनिक (४४) याची हत्या करण्यात आली. या हत्येमुळे रामबाग परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. ही घटना गुरुवारी मध्यरात्री १२ वाजल्यानंतर घडली. सोनू वासनिक याच्याविरुद्ध वर्धा शहरात ३० हून अधिक गुन्हे दाखल होते. ज्यात दरोडा, खुनाचा प्रयत्न आणि खंडणी यासारखे गंभीर गुन्हे समाविष्ट आहे.

कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी वर्धा पोलिसांनी त्याला एमपीडीए अंतर्गत एक वर्षासाठी तुरुंगात पाठवले होते. तुरुंगातून सुटताच जुने वैमनस्य त्याच्या मृत्यूचे कारण बनले. एक दिवस आधी तुरुंगातून सुटलेला सोनू वासनिक त्याच्या जुन्या मित्रांना भेटण्यासाठी नागपूरला रामबाग मध्ये आला होता.

त्याच्या काही मित्रांसोबत बाहेर दारू पिण्यासाठी गेला. दारूच्या नशेत सोनू अनेकदा इतरांशी भांडायचा आणि या भांडखोर स्वभावच त्याच्या जीवावर घेतला.

दारूच्या नशेत सोनूचा त्याचा जुना मित्र आकाश प्रफुल्ल मेश्राम (२७) याच्याशी वाद झाला. हा वाद इतका वाढला की दोघांमध्ये हाणामारी झाली. शिवीगाळ आणि धक्काबुक्की केल्यानंतर आकाश आणि त्याच्या मित्रांनी सोनूच्या डोक्यात मोठ्या दगडाने वार करून त्याची हत्या केली.




याप्रकरणी पोलिसांनी एका आरोपीला अटक केली. अन्य आरोपी फरार आहेत. हत्येची माहिती मिळताच इमामवाडा पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून मुख्य आरोपी आकाश मेश्रामला अटक केली. या हत्याकांडात सहभागी असलेले त्याचे इतर साथीदार अजूनही फरार आहेत. पोलिसांनी त्यांचा शोध घेण्यास सुरुवात केली आहे. या घटनेने रामबाग भागात दहशत आहे.

### मंगल कार्यालयातच खून

यशोधरा नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शिवछत्रपती मंगल कार्यालयात सुरू असलेल्या भांडणात एका युवकाला मध्यस्थी करणे जीवावर बेतले. आरोपींनी एका युवकाला चाकूने भोकसून खून केला. विहांग मनीष रंगारी (२४ वर्ष), टेका नाका, मानव नगर असे मृत युवकाचे नाव आहे.

तो गुरुवारी रात्री ११ वाजता मित्राच्या लग्न समारंभात आला होता. लग्नात आरोपी बिरजू वाढवे आणि त्याच्या सहकाऱ्यांचे काही युवकांसोबत भांडणं सुरू होते त्या भांडणात मध्यस्थी करण्यासाठी विहान रंगारी यांनी पुढाकार घेतला. मात्र आरोपी बिरजू वाढवे आणि त्याच्या सहकाऱ्यांनी विहांगवर हल्ला करीत त्याला ठार केले. हत्याकांडानंतर सर्व आरोपींनी तिथून पळ काढला. यशोधरा नगर पोलिसांनी दोन पथके तयार करून आरोपींचा शोध घेणे सुरू केले आहे. मात्र, अद्याप एकही आरोपी पोलिसांच्या हाती लागला नाही याप्रकरणी यशोदा नगर पोलिसांनी हत्याकांडाचा गुन्हा नोंदविला आहे.

## ऊर्जा परिवर्तनासाठी महाराष्ट्र सज्ज

**■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २१ :**

आर्थिक प्रगतीमुळे २०३० पर्यंत महाराष्ट्र राज्याची विजेची गरज युरोपातील जर्मनी, स्पेन, इटली अशा प्रगत देशांपेक्षा जास्त असेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात ३.३ लाख कोटी रुपये गुंतवणुकीचा राज्याचा ऊर्जा परिवर्तन आराखडा तयार करण्यात आला असून भविष्यातील आव्हाने पेलण्यासाठी महाराष्ट्र सज्ज आहे, असे प्रतिपादन अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी केले.



आशियाई विकास बँक (एडीबी) तर्फे महाराष्ट्रातील कृषी क्षेत्राचे सौर ऊर्जीकरण या विषयावर आयोजित एक दिवसाच्या चर्चासत्राचे उद्घाटन करताना आभा शुक्ला बोलत होत्या. यावेळी महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र आणि एडीबीच्या ऊर्जा संचालक डॉ. सुजाता गुप्ता उपस्थित होते.

आभा शुक्ला म्हणाल्या की, राज्याची विजेची गरज मोठ्या प्रमाणात वाढेल. भविष्यातील आव्हाने ध्यानात घेऊन राज्याची सध्याची ४२ हजार मेगावॅटची क्षमता २०३० साली ८१ हजार मेगावॅटवर नेण्यासाठीचा ऊर्जा परिवर्तन आराखडा तयार करण्यात आला आहे. राज्याची ऊर्जा क्षमता वाढविताना नवीकरणीय ऊर्जेवर भर दिल्यामुळे पर्यावरण रक्षणाला मदत होण्यासोबतच किफायतशीर दरात वीज उपलब्ध झाल्यामुळे विजेचा खर्चही मोठ्या प्रमाणात कमी होईल.

लोकेश चंद्र म्हणाले की, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ही एक गेम चेंजर योजना आहे. या योजनेच्या अंतर्गत २०२६ साली राज्यातील सर्व कृषी पंप सौर ऊर्जेवर चालविण्यात येतील. कृषी क्षेत्रासाठी शंभर टक्के सौर ऊजेर्चा वापर करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरेल. यावेळी सुजाता गुप्ता यांनीही उपयुक्त माहिती दिली.

## बोर्डाचा दहावी परीक्षेचा मराठीचा पेपर लीक

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१ :**

आजपासून दहावी बोर्डाचीपरीक्षा सुरू झाली आहे. मात्र जालना जिल्ह्यातील बदनापूर येथे परीक्षा सुरू झाल्याच्या काही वेळातच मराठीचा पेपर लीक झाल्याची माहिती समोर आली आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने दहावी बोर्ड परीक्षेला आजपासून सुरुवात झाली. मात्र परीक्षेच्या पहिल्या दिवशी कॉफी मुक्त अभियानाचा फज्जा उडला. जालना जिल्ह्यामध्ये लीक झाल्याची माहिती समोर आली आहे. एवढेच नाही तर केवळ वीस रुपयात परीक्षा केंद्र बाहेर पेपरची कॉपी मिळत होती, असा देखील आरोप केला जात आहे.

जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यात असलेल्या तळणी गावात कॉपी मुक्त अभियानाचा पहिल्याच दिवशी फज्जा उडल्याचे पाहायला मिळाले.



### प्रश्नपत्रिका थेट व्हाट्सॲपवर

**यवतमाळ :** महागाव तालुक्यातील कोठारी येथील आदर्श विद्यालयात पेपर सुरू होण्यापूर्वीच प्रश्नपत्रिका व्हाट्सॲपवर व्हायरल झाली. बाहेर मराठीची प्रश्नपत्रिका काहींच्या व्हाट्सअपवर आल्याची चर्चा सुरू झाली. त्यामुळे पेपर सुरू होण्यापूर्वीच पेपर फुटल्याच्या चर्चेने जोर पकडला.

## शिक्षण विभागात त्रयस्थ व्यक्तींच्या तक्रारींना मनाई

**■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २१ :**

उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा निर्णय

दिवसापूर्वी राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने एक महत्त्वपूर्ण शासन निर्णय जारी केला आहे. यानुसार आता प्रकरणाशी संबंधित नसलेल्या त्रयस्थ व्यक्तींकडून येणाऱ्या तक्रारी, अर्ज, निवेदने किंवा धमकींची दखल घेतली जाणार नाही. हा निर्णय १८ फेब्रुवारी रोजी जारी झाला.

विभागाने १४ ऑक्टोबर २०१९ च्या परिपत्रकातील कार्यपद्धती आणि न्यायालयीन आदेशांचा विचार करून हा निर्णय घेतला आहे. विभागातील अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत की कोणत्याही न्यायालयीन निर्णयाशी विसंगत कार्यवाही करू नये.

संभाजी नगर उच्च न्यायालयाने याचिका क्रमांक २४९२/२०२४ मध्ये महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले आहे. न्यायालयाने स्पष्ट केले की सामाजिक कार्यकर्ते, प्रत्यक्षदर्शी किंवा संस्थेशी संबंध नसलेल्या व्यक्तींचे अर्ज विचारात घेऊ नयेत.

हेमराज जगन्नाथ फेडाडे प्रकरणात (याचिका क्र. ५९७३/२०२०) न्यायालयाने आणखी एक महत्त्वाचा निर्णय दिला. सेवा न्यायशास्त्रात सामान्य व्यक्तींना शिक्षण विभागाच्या कार्यक्षेत्रातील बाबींवर प्रश्न उपस्थित करता येणार नाही. तसेच १३ एप्रिल २०१६ च्या आदेशानुसार शिक्षकांना दिलेल्या मंजुरींबद्दल शैक्षणिक संस्थांनाही प्रश्न विचारता येणार नाहीत.

## राज ठाकरे मुंबई मनपात

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१ :**

आगामी काळात होणाऱ्या मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे मैदानात उतरले आहेत. मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या दृष्टिकोनातून मनपा क्षेत्रातील विविध समस्यांबाबत राज ठाकरे यांनी मुंबई मनपा आयुक्तांची भेट घेतली. यावेळी राज ठाकरे आणि मनपा आयुक्त यांच्यात विविध विषयावर चर्चा झाली. आपण पाच वर्षानंतर मुंबई महानगरपालिकेत आलो असल्याचे राज ठाकरे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

मुंबई महानगरपालिका क्षेत्रात जमिनीखालून मोठ्या प्रमाणात केबल जातात. या केबल अदानी, अंबानी किंवा रिलायन्स, एअरटेल अशा कोणत्याही कंपनीच्या असू शकतात. या सर्व केबलच्या संदर्भात महानगरपालिका कर का करत नाही? असा प्रश्न विचारल्याचे राज ठाकरे यांनी सांगितले.

## : साप्ताहिक संवाद :

### सरासरी वीजदरात स्थिरता आणणे शक्य

**लोकरंग**

महावितरणने जानेवारी महिन्यात नियामक आयोगासमोर पाच वर्षासाठी वीजदराचा प्रस्ताव दाखल केला आहे. त्यावर जनसुनावणी होऊन एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात निर्णय होईल. वीजदराचा हा मुख्य प्रस्ताव ५५० पानांचा आहे. त्यानुसार पुढील काळात वीजदरात घट खरोखरच शक्य होणार आहे. याच अनुषन्गाने प्रयास ऊर्जा गटाचे सदस्य शंतनू दीक्षित यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

**घरगुती आणि व्यावसायिक वीजदर नेमके कोणत्या निकषांवर ठरवले जातात?**

■ वितरण कंपनीचे वीजदर हे खर्चावर आधारित ठरतात, त्यामुळे ते कमी होण्याचा पहिला टप्पा म्हणजे वीज वितरण कंपनीचा एकूण खर्च कमी होणे व त्यानंतर कोणत्या ग्राहकांचा वीजदर कमी करणे हा दुसरा टप्पा. वीज वितरणामध्ये सुमारे ७० टक्के खर्च हा वीजखरेदीचा असतो. त्यामुळे दर कमी करण्यासाठी वीज खरेदीच्या खर्चामध्ये बचत करणे गरजेचे ठरते.

**या प्रस्तावित दरानुसार खरोखरच ग्राहकांच्या वीजदरात घट होईल का?**

■ महावितरण कंपनीच्या प्रस्तावानुसार येत्या पाच वर्षात एकूण खरेदीतील अक्षय ऊर्जेचा वाटा सध्याच्या १४ टक्क्यावरून ४७ टक्के इतका वाढणार आहे. यात मुख्यतः मुख्यमंत्री सौर कृषिवहिनी योजनेअंतर्गत खरेदी करण्यात येणारी १६ हजार मेगावॅट सौरऊर्जा व इतर १८ हजार मेगावॅट अक्षय ऊर्जेचा समावेश आहे. सौर ऊर्जा खरेदीचा दर हा ३ रुपये दहा पैसे आहे आणि तो पंचवीस वर्ष स्थिर राहणार आहे.

एकूण अक्षय ऊर्जेचा सरासरी खरेदी दर सुमारे ३ रुपये ३० पैसे म्हणजेच पारंपरिक कोळशावर आधारित वीज खरेदी दरापेक्षा खूपच कमी आहे. त्यामुळे अक्षय ऊर्जेच्या अवधात्या प्रमाणाचा फायदा एकूण वीज खरेदीचा दर भविष्यत स्थिर राहण्यासाठी होणार आहे. याचा फायदा मुख्यतः ३०० युनिटपेक्षा कमी वीज वापरणाऱ्या छोट्या वीज ग्राहकांना होणार आहे.

**ग्राहकांसाठी नव्या वीजदराची रचना नेमकी कशी असेल?**

■ अक्षय ऊर्जा खरेदीचा दर कमी असला तरी या कमी खरेदीदराचा फायदा ग्राहकांना देण्यासाठी वीजदर रचनेमध्ये बदल करणे अत्यंत गरजेचे होते.

नव्या रचनेमध्ये औद्योगिक आणि व्यावसायिक ग्राहकांना सकाळी नऊ ते संध्याकाळी पाच त्याकाळातील वीज वापरासाठी २ रुपये ३५ पैसे सूट देण्यात येणार आहे. जे घरगुती ग्राहक टाइम ऑफ द डे हे मीटर लावून घेतील त्यांनाही वीजदरात ८० पैसे सूट प्रस्तावित आहे. तर जे मोठे ग्राहक आहेत जे नेट मीटरिंग द्वारे स्वतःची सौरऊर्जा वापरतात तयन आयोगाच्या नियमावली प्रमाणे दीड सपोर्ट चार्ज देण्यात येणार आहे. ■ ■

### महाराष्ट्रातील पहिली रोबोटिक निप्पल स्पेअरिंग मॅसेक्टॉमी

कर्करोग हा जागतिक स्तरावर मनात भिती निर्माण करणारा आजार आहे. अव्हानांना सामोरे जाण्याकरिता कर्करोग निदान तंत्र आणि तंत्रज्ञानातील आधुनिकता ही लवकर निदान करण्याचा दर, आयुष्याचा दर्जा सुधारणे आणि काळजीमधील दरी भरून निघण्यासाठी उपयुक्त ठरते.


कर्करोगाचा उपचार कितीतरी प्रमाणात पुढे गेला असून रूग्णाचा आयुष्याचा दर्जा सुधारताना दिसतो आहे. या आधुनिकतांसह, कर्करोगाचा शस्त्रक्रियेमध्ये रोबोटिक निप्पल-स्पेअरिंग मॅसेक्टॉमी (आरएनएसएम) टीलूपसह एकत्रित केल्याने इम्प्लान्टमध्ये दिसून येणारी सुधारणा ही थक्क करणारी आहे.

कल्पक अशा वैद्यकिय पल्लूयामध्ये, अपोलो कॅन्सर सेंटर, नवी मुंबईने यशस्वीपद्धतीने महाराष्ट्रातील पहिली रोबोटिक निप्पल-स्पेअरिंग मॅसेक्टॉमीची पुनर्रचना ही टीलूपचा वापर करून केली आहे. ही प्रक्रिया कर्करोगाचा प्रतिबंध आणि पुनर्रचनेमधील एक अग्रगण्य प्रक्रिया ठरली आहे. या यशामुळे ऑन्कोलॉजी सुरक्षितता आणि रूग्णांकरिता सौंदर्य अनुभवामध्ये मोठ्या प्रमाणात आधुनिकता विकसित झाली आहे. ही शस्त्रक्रिया यशस्वी पद्धतीने नवी मुंबई येथील, अपोलो कॅन्सर सेंटरचे कर्करोग शल्यचिकित्सक डॉ. संदिप बिप्ते यांचा मार्गदर्शनाखाली इतर निपुण अशा चिकित्सकांचा समूहाद्वारे करण्यात आली.

शस्त्रक्रियेमधील तंत्रज्ञानाची आधुनिकता, रोबोटिक निप्पल-



स्पेअरिंग मॅसेक्टॉमी आणि आधुनिक रिकन्स्ट्रक्शनचा पर्यायामुळे मिनिमल इन्व्हेजन, सुरक्षितता आणि अधिक चांगल्या सौंदर्य उपलब्धीचे पर्याय देखील प्राप्त होतात. यामुळे तब्येत सुधारते ज्यामुळे स्तन कर्करोग आणि त्याचा प्रोफायलॅक्टिक शस्त्रक्रियेमध्ये नवीन गुणवत्तेचा उच्चांक गाठला जातो. ■ ■



### पर्यटकांचे आकर्षण यवतमाळ

यवतमाळ हा महाराष्ट्रातील प्रमुख जिल्ह्यांपैकी एक आणि विदर्भ विभागात येतो. लोकसंख्येनुसार विदर्भातील सर्वात मोठा तिसरा जिल्हा आहे. चिंतामणी मंदिर हे यवतमाळ जिल्ह्यातील एक प्रमुख पर्यटनस्थळ आहे. महाराष्ट्रातील २१ गणेश पीठांपैकी एक आणि विदर्भातील अष्टपिठापैकी एक अशी ख्याती आहे. चिंतामणी गणेश मंदिर हे यवतमाळ जिल्ह्यातील कळंब येथे आहे. यवतमाळ शहरापासून चिंतामणी गणेश मंदिर हे २३ किलोमीटर अंतरावर आहे. चिंतामणी गणेश मंदिर हे गावाच्या भू पातळीपासून ३३ फूट खोल गाभाऱ्यात असून उतरण्यासाठी चिरेबंदी अशा दगडाच्या २९ पायऱ्या आहेत. मुख्य गाभाऱ्यामध्ये चिंतामणी गणेशाची साडेचार फूट उंचीची मूर्ती आहे.

पैनगंगा वन्यजीव अभयारण्य हे यवतमाळ आणि नांदेड या दोन जिल्ह्यांना विभागणाऱ्या पैनगंगा नदीच्या किनाऱ्यावर वसलेले आहे.जानेवारी १९१६ मध्ये पैनगंगा वन्यजीव अभयारण्यची स्थापना करण्यात आली होती. पैनगंगा वन्यजीव अभयारण्य हे ३२५ चौरस किलोमीटर अंतरामध्ये पसरलेले आहे. या अभयारण्यामध्ये आपल्याला अस्वल, कोल्हा, चितळ, तरस, नीलगाय, हरिण असे अनेक प्राणी पाहायला मिळतात. पैनगंगा वन्यजीव अभयारण्य आहे यवतमाळ शहरापासून १५० किलोमीटर अंतरावर स्थित आहे.

■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## भाच्याला हवी आमदार निवासातील मामाचीच खोली

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१ :**

नवनिर्वाचित आमदारांसाठी आकाशवाणी आमदार निवासातील रूम्स वाटपाच्या प्रक्रियेत मोठा वाद निर्माण झाला आहे. काँग्रेसचे जेष्ठ नेते आणि माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांची रूम सध्या चर्चेचा विषय ठरली आहे.

विधान परिषद सदस्य सत्यजित तांबे यांनी आपल्या मामांची म्हणजेच बाळासाहेब थोरात यांची रूम मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू केल्याची जोरदार चर्चा आहे.

मागील विधानसभा निवडणुकीत संगमनेर मतदारसंघातून बाळासाहेब थोरात पराभूत झाले, त्यामुळे त्यांना मिळालेली आमदार निवासातील रूम रिकामी झाली. निवडणूक जिंकून विधानसभेत आलेले आमदार अमोल खताळ यांनी त्यावर दावा केला आहे.

मात्र, सत्यजित तांबे यांनीही तीच रूम आपल्याला मिळावी, असा आग्रह धरल्याने हा वाद चांगलाच तापला आहे.

सत्यजित तांबे यांच्याकडे आधीच आमदार निवासातील एक रूम आहे, जी त्यांचे वडील आणि माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांच्याकडे असताना त्यांना मिळाली होती. आता मामांचीही रूम हवी असल्याने त्यांनी प्रशासनावर दबाव आणल्याचा आरोप अमोल खताळ यांनी केला आहे. अमोल खताळ यांनी या प्रकरणी थेट उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे तक्रार केली असून, विधानसभा अध्यक्षांनाही भेटणार असल्याचे सांगितले आहे. या प्रकरणावरून मात्र खमंग चर्चा रंगली आहे.